शुक्रवार, १३ ऑक्टोबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ७०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक


● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 13 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-70 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# बिग बी अमिताभच्या वाढदिवसाची अनोखी भेट!



सुपरस्टार अमिताभ बच्चन यांच्या 81व्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रीय रंगावली कलाकार सोमनाथ भोंगळे यांनी सासवड येथील पुरंदर शाळेच्या मैदानावर पाच हजार पुस्तके व पाचशेहून अधिक दप्तरांच्या माध्यमातून हे भव्य आणि आकर्षक कोलाज साकारले आहे. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# आँखोंसे जो उतरी हैं दिलमें...

सोडून आसन उठले राघव, उठुनि कवळती अपुले शैशव पुत्रभेटीचा घडे महोत्सव, परी जो उभया नच माहिती. अशी जादू जणू हे शब्द करतात ! मग ते शब्द वाल्मिकींचे असोत वा गदिमांचे. ती अमूर्त अक्षरे ध्वनीचे रूप घेऊन कानावाटे हृदयापर्यंत पोहोचतात. आनंदाच्या चांदण्याची बरसात होते. कर्तव्यकठोर असलेल्या श्रीरामांचे देखील डोळे पाणावतात. माया, ममता, प्रेम, करुणा सगळे सगळे भाव हे शब्द उभे करतात. असं म्हटलं जातं की प्रख्यात जर्मन कवी गटे यांनी कालिदासाच्या शाकुंतल या नाटकाचं जर्मन भाषेत केलेलं भाषांतर जेव्हा वाचलं, तेव्हा त्यांना इतका आनंद झाला की हा जर्मन कवी आपलं देहभान विसरून शाकुंतल डोक्यावर घेऊन नाचला. कुठून आला हा आनंद ? पुस्तकाच्या वाचनातूनच ना ? या आनंदाला उपमा नाही आणि त्याची तुलना इतर कुठल्या आनंदाशी होऊ शकत नाही. त्या काळात पाश्चात्य साहित्यात सौंदर्यवाद मूळ धरू लागला होता. अशा काळात कालिदासाने लिहिलेलं शकुंतलेचं आणि निसर्गाचं वर्णन वाचून हा कवी अक्षरशः वेडा झाला. त्याने त्यावेळी शाकुंतल या ग्रंथाबद्दल काढलेले उद्गार असे आहेत. ' वसंतऋतूतला मोहोर आणि ग्रीष्म ऋतूतलं फळ हे सर्व एकाचवेळी ( युगपद् ) ज्यात आहे, जे ( एकाच वेळी ) मनाला शांत करणारे ( संतर्पणम् ) आणि मोहितही करणारे आहे. किंवा स्वर्ग आणि पृथ्वी यांचं ऐश्वर्य जर एकाच वेळी एकत्र हवं असेल तर प्रियमित्रा, तू शाकुंतलाचा आस्वाद घे. ' मला वाटतं हेच उद्गार सर्व ग्रंथांना लागू होतात. ज्ञानेश्वर माऊलींची माफी मागून त्यांच्या भाषेत मला असे सांगावेसे वाटते ग्रंथ सर्व रसांचा आगरु, ग्रंथ सर्व सुखांचा सागरु तरी ग्रंथ हाती घेईजे, मग सर्व सुखाते पात्र होईजे. जशी प्रेशर कुकरमध्ये कोंडलेली वाफ बाहेर पडणे आवश्यक असते त्याचप्रमाणे आपल्या मनात साठलेल्या भावनांचे सुद्धा मुक्त होणे, निचरा होणे किंवा ज्याला आपण विरेचन असे म्हणू तेही आवश्यकच असते. पुस्तके आणि त्यांचे वाचन अशा प्रकारचे भावनांचे विरेचन ज्याला इंग्रजीत कॅथर्सिस म्हटले जाते ते घडवून आणतात. मी वाचकही आहे आणि लेखकही. माझा तर श्वास म्हणजे वाचन ! मी जेव्हा आनंदी असतो तेव्हा एखादे आवडते पुस्तक हातात घेतो आणि माझा आनंद दुणावतो. मी जेव्हा दुःखात असतो तेव्हाही एखादे पुस्तक हातात घेतो आणि माझे दुःख उणावते. थोडक्यात म्हणजे गणपतीच्या आरतीत म्हटल्याप्रमाणे चांगल्या पुस्तकांचे वाचन हे ' सुखकर्ता दुःखहर्ता ' अशा प्रकारचे आहे.





## आनंदी पहाट

# आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अंतरात्म्याला शांती मिळणे अत्यंत जरुरीचे असते, कारण त्यातच खरा आनंद असतो. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा खरे तर

आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्या व्यतिरिक्त अजून एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची. आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणे मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आनंदाची गोडी अवीट असते, त्यामुळे आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही. आनंदाची प्राप्ती करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन, व्यवहाराची गरज असते. त्यायोगेच सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ शकते. आनंदाची निर्मिती आपल्याच अंतरंगांत करावी लागत असते. आनंद प्राप्ती म्हणजेच खरी यशप्राप्ती असते; हे ज्या व्यक्तीला समजते, त्याच व्यक्तीला त्याच्या जीवनातील सार कशात आहे, हेही कळू शकते. आपल्या जीवनातील सार कशात आहे, हे आपण स्वतःच शोधून काढायचे असते. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे. आपल्या मनात येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो. नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची आपल्याला सतत जाणीव होणे आवश्यक असते.



आधुनिक केसरी

## ज्ञाना मुक्त त्यासी केला ||

हरि भजनी रमला | देह चित्तासी भेटला ||१||
मुखी विठ्ठल विठ्ठल | विश्व व्यापिले सकल ||२||
मनी ध्यान गोविंदाचे | तेथे उरे काय साचे ||३||
माझे मीपण सरले | श्वास विठ्ठलचि झाले ||४||
आता उरे मागे काही | चिंता विठु सर्व वाही ||५||
नको स्वर्ग-मोक्ष काही | दास विठ्ठलाचा होई ||६||
नाना संसारी गुंतला | ज्ञाना मुक्त त्यासी केला ||७||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

|| इति श्रीगुरोराज्ञया चन्द्रहासविरचितं सकल-कल्याण-कारकं श्रीदुर्गादेवीनमनं सम्पूर्णम् ||
|| अशा प्रकारे, श्रीगुरूंच्या आज्ञेने चंद्रहासविरचित सर्वांचे कल्याण करणारे असे श्रीदुर्गादेवीनमन पूर्ण झाले.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

समाधिस्थ गुरु आप्त हैं, तत्वदर्शी विज्ञान ।
संशय भ्रम सब नाशहीं, देहिं भक्ति निरवान
।।३४।(स्वर्वेद पंचम मण्डल त्रयोदश अध्याय) ०५/१३/३४

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
नित्य अनादि सद्गुरुंच्या तत्त्वज्ञान उपदेशा द्वारे समाधिस्थ, आप्त, योगीश्वर जगात तयार होतात , जे ब्रह्मविद्येच्या समस्त तत्त्वांचे द्रष्टा, वैज्ञानिक असतात. जे आपल्या उपदेश तत्त्वज्ञाना द्वारे सर्व संशय आणि भ्रमांचा नाश करून भक्ती आणि निर्वाणपद प्रदान करतात.

..........................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## शून्यत्वनिरसन

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


मित्रांनो या समासात प्रत्येक जण वेगवेगळे मत मांडतात. ते वेगळे मतमतांतरे कसे ते आपण पाहूया. पण हा समास अभ्यासत असताना आपण आजच्या काळात कसं वागायचं कसं साधं पण स्वच्छ जीवन जगायचं हे हे ठरवणे गरजेचे आहे. आणि समर्थांना देखील हेच सांगायचं आहे हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

एक म्हणतो की बटुभैरवाची भक्ति केली की वैभव प्राप्त होते. एक म्हणतो काळी कंक कंकाळीची भक्ति करा,एक म्हणतो भद्रकाली ची,तर एक म्हणतो उष्टी चांडाळी प्रसन्न करून घ्यावी.एक म्हणतो गणपती,एक म्हणतो भोळा शंकर लवकर पावतो,एक म्हणतो भगवती देवता प्रसन्न होऊन आशीर्वाद देते,एक म्हणतो मल्हारी मार्तंड,तर एक म्हणतो व्यंकटेशाची भक्ति सर्वात उत्तम होय.

# विषयाची व लौकिकाची आस सोडावी

आधुनिक केसरी

आपण रामाचे झालो म्हणजे आपली काळजी त्याला लागते. आपण रामाचे व्हायला अडचण आमचीच. आवडच मुळी आपण विषयाची आणि लौकिकाची ठेवतो. साहजिकच, एकाची आसक्ति ठेवल्याने दुसऱ्याची विरक्ति येते. नोकरीच्या वेळेस आम्ही बायकामुलांना बाजूला सारून कामावर जातो ना ? मग साधनेच्या वेळी बायकोमुले आड येतात हे कारण का सांगावे ? बायको आणि पैका या दोन गोष्टी आमच्या आड येत असतात; असे आजवर अनेक संतांनी सांगितले. मग या निर्माण तरी का केल्या असे कोणी विचारतील. त्याला उत्तर म्हणजे, काड्याच्या पेटीने विस्तवही पेटविता येतो आणि घरही जाळता येते; त्याचा जसा आपण उपयोग करावा तसा तो होतो. खरे म्हणजे आम्हाला भगवंताची तळमळच लागत नाही. एकजण मला म्हणाला की, "मला प्रपंच टाकावासा वाटतो." मी त्याला म्हटले, "नुसता प्रपंच टाकण्याने तुला वैराग्य कसे येईल ? वैराग्याला नेहमी विवेकाची जोड लागते. तू आपला मीपणा टाकलास तरी खूप झाले. "



चांगले कर्म आड येत नाही असे थोडेच आहे ? वाईट कर्म कुणाला सांगण्याची तरी आपल्याला लाज वाटते, पण सत्कर्म अभिमानाने ज्याला त्याला सांगत सुटतो. 'मागील जन्मी पाप केले होते म्हणून या जन्मी हे भोगतो' असे म्हणतो; आणि 'आता चांगले कर्मे करतो म्हणजे पुढल्या जन्मी सुख लागेल' असे म्हणतो. म्हणजे जन्ममरण्याच्या फेऱ्यातून सुटण्याऐवजी त्याच्यात गुंडाळले जाण्यासारखेच झाले ! दुष्कर्मामुळे पश्चात्ताप होऊन एकदा तरी भगवंताची आठवण होईल; परंतु सत्कर्माचा अहंकार चांगल्या माणसालाही कुठे नेऊन सोडील याचा पत्ता लागणार नाही.

राजासुद्धा योग्य मार्ग दाखविण्यासाठी आपल्या संगतीला चांगला माणूस ठेवतो. भगवंताने उद्धवालाही 'सत्समागम कर' म्हणून सांगावे, याहून अधिक काय पाहिजे ? कडू कारले खाल्ले तर कडूपणाचीच प्रचीती होते मग विषयाच्या प्राप्तीने जीवन गोड कसे होईल ? 'प्रेम येईल तेव्हा भगवंताची भक्ति करीन' असे म्हणू नये. विषयासाठी आपण मरमर काम करतो आणि तेवढे करूनही सुख लाभत नाही' मग भगवंताचे नाव न घेता, प्रेम येत नाही हे म्हणणे किती वेडेपणाचे आहे ! लग्नाआधी मुलीला दहापाच जणांना दाखविली तरी, लग्न झाल्यावर ज्याप्रमाणे त्यांतला एकच नवरा असतो आणि बाकीच्यांची तिला आठवणही राहात नाही, त्याप्रमाणे, आम्ही एकदा रामाचे झालो, म्हणजे त्याच्याशी लग्न लावले, म्हणजे मग विषयांचे प्रेम कुठे आले ?

## गहिनीनाथ



त्यानें मीननाथास तिलोत्तमेच्या स्वाधीन केलें व मच्छिंद्रनाथाचा सारा वृत्तांत तिला सांगितला. तेव्हां मच्छिंद्रनाथाच्या भेटीची निराशा झाल्यामुळें तिच्या डोळ्यांस पाणी आले. तें पाहून एक वेळ तुला मच्छिंद्रनाथ भेटेल, तूं कांहीं चिंता करुं नको, असें सांगून उपरिक्षवासु आपल्या स्थानीं गेला. मग ती मुलावर प्रीति करून आनंदानें राहिली.

इकडे गर्भाद्रिपर्वतावर गहिनीनाथास अभ्यास करविण्याकरितां गोरक्ष व मच्छिंद्रनाथ राहिले. उमाकांतहि तेथेंच होते. त्या सुवर्ण पर्वतावर अदृश्यास्त्राची योजना करून कुबेर आपल्या स्थानीं गेला. अदृश्यास्त्राच्या योगानें सुवर्णाचा वर्ण झांकून गेला; परंतु त्या पर्वतावर शंकर राहिले. ते अद्यापि तेथेंच आहेत. त्यास 'म्हातारदेव' असें म्हणतात. त्याच्या पश्चिमेस कानिफनाथ राहिला; त्यानें त्या गांवाचें नांव मढी असें ठेविलें. त्याच्या दक्षिणेस मच्छिंद्रनाथानें वसति स्थान केलें. त्याच्या पूर्वेस जालंदरनाथ राहिला. त्याच पर्वताच्या पलीकडे वडवानळ गांवीं नागनाथानें वस्ती केली. विटे गांवांत रेवणसिद्ध राहिला.

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, १३ ऑक्टोबर २०२३




भारताची नवी मुत्सद्देगिरी पान ६



लई नाही मागणे.. पान ८

# आ. लोणीकर यांच्या हस्ते रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

## शंभुमहादेव मंदिर ते पांगरी गोसावी, बेल्होरा ते बोरखेडी रस्त्यासाठी 8 कोटी 50 लाख रुपये

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** केंद्रीय बांधकाम मंत्री नितीनजी गडकरी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे आणी उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या कडे सतत पाठ पुरावा करत परतुर विधानसभा मतदारसंघात विविध योजनेतून मजबूत टिकवून उत्कृष्ट रस्त्याचे जाळ निर्माण करू शकलो. मतदार संघात गावागावात आणि वाडी वस्ती तांड्यावर तसेच सर्व झोपडपट्ट्यांवर जाण्यासाठी रस्त्याचे मजबूत जाळ निर्माण करत असताना पंढरपूर शेगाव दिंडी महामार्ग पूर्ण केल्यान समाधान वाटत असल्याच प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केले ते शिवणी व राठोड नगर तालुका जालना जिल्हा जालना येथे ईजिमा-67 ते शिवनी राठोडनगर ग्रामा-16358 की.मी. 0/00 ते 3/500 (प्र. मा. 300लक्ष रुपये) रस्त्यावरील पूलासह रस्त्याचे बांधकाम करणे तर शंभू महादेव येथे शंभु महादेव मंदिरा जवळील पाण्याच्या टाकीपासून ते पांगरी गोसावी गावा प्रयन्त 04.65 किलोमीटर रस्त्याचे पुलासह मजबुतीकरण खडीकरण व डांबरीकरण (प्र. मा. 400 लक्ष रुपये)कामाच आणी बेल्होरा येथे बेलोरा बोरखेडा जिल्हा सरहद रस्त्याचे मजबुतीकरण खडीकरण व डांबरीकरण (प्र. मा. 150 लक्ष) कामाचे उदघाटन आज राज्याचे माजी पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री तथा परतूर विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय विदमान आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभ हस्ते आज संपन्न झाले या वेळी बोलत होते. या वेळी दौऱ्या दरम्यान शिवणी राठोड नगर शंभुमहादेव आणी बेल्होरा येथील व्यासपिठावर भाजपाचे जालना जिल्हा उपाध्यक्ष माऊली शेजूळ प्रकाश टकले विक्रम उफाड गजानन उफाड गुत्तेदार अमित देशमुख सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता निवारे यांची प्रमुख



उपस्थिती होती. तर शिवणी येथे उद्धवराव खेडकर विजय घाडगे एकनाथराव खेडेकर एकनाथ खेडेकर गजानन खेडेकर विजय खेडेकर रवींद्र खेडेकर बालाप्रसाद खेडेकर शिवाजी घाडगे प्रकाश टकले, उद्धवराव खेडेकर,गोविंद चंदू राठोड, गजानन उफाड, विक्रम उफाड, सरपंच सुमनताई राठीड, विजय घाडगे, सचिन घाडगे, विलास जाधव, नंदू घोडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता निवारे, शाखा अभियंता श्री सोनी, श्रीराम राठोड, गजानन खराबे, सुभाष राठोड राम राठोड गुलाब चव्हाण उत्तम राठोड श्रीराम राठोड शिवाजी राठोड संतोष राठोड रमेश राठोड कृष्णा चव्हाण श्रीराम राठोड विठ्ठल राठोड संजय जाधव उदय राठोड श्रीराम राठोड राजू राठोड माऊली पवार एकनाथ जाधव प्रल्हादराव सरकटे गोविंदराव केंदळे सुनील नागरे प्रभाकर जाधव बाबासाहेब जाधव सुरेश काळे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की मतदार संघातील गावागावात जिथे जिथे मंदिर असेल त्या त्या सर्व ठिकाणी आपण विविध योजने तुन मोठ मोठे सभागृह निर्माण केले असून शेतकऱ्यांच्या विजेचा प्रश्न कायमचा सोडविण्याकरिता मतदारसंघात विजेचे जाळ निर्माण केला असून मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेविषयी बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की ज्या गावात अद्याप पिण्याची शुद्ध पाणी पोहोचले नाही अशा राहिलेल्या सर्व गावात येत्या दिवाळी पूर्वी घराघरात पिण्याची शुद्ध पाणी पोहोचविण्याचा आपला मानस असून त्या दृष्टीने विविध अधिकाऱ्यांच्या विविध ठिकाणी आपण सातत्याने बैठका घेऊन पाठपुरावा करत आहोत.



# संतोष राऊत 'मराठवाड्याचे शिल्पकार' पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृतमहोत्सव समारोह समिती आणि वृंदावन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृतमहोत्सवी वर्ष सांगता समारंभानिमित्त मराठवाड्यातील विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या 21 जणांना 'उद्याच्या मराठवाड्याचे शिल्पकार' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये मंत्रालयात उपमुख्यमंत्री कार्यालयाचे प्रशासन अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त किमान कौशल्य विभाग व धाराशिव जिल्ह्यातील रहिवासी संतोष राऊत यांनाही प्रशासकीय कार्याबद्दल 'उद्याच्या मराठवाड्याचे शिल्पकार' या पुरस्काराने केंद्रीय पेट्रोलियम राज्यमंत्री रामेश्वर तेली यांच्या हस्ते पुणे शहरातील टिळक रोड येथील सभागृहात सन्मानित करण्यात आले.

यावेळी मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृतमहोत्सव समारोह समितीचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, संयोजक सचिन पाटील, विश्व हिंदू परिषदेच्या देवगिरी प्रांताचे सहमंत्री गणेश मोकाशी, संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे वंशज ह.भ.प. माणिकबुवा महाराज मोरे, देहू संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. प्रा. पुरुषोत्तम महाराज मोरे, ह.भ.प.भानुदास महाराज मोरे, रिअर ॲडमिरल (निवृत्त) पुरुषोत्तमदत्त शर्मा व्यासपीठावर उपस्थित होते.

# विद्याभवनमध्ये सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**कळंब :** विद्याभवन हायस्कूल कळंब या प्रशालेत अखिल भारतीय साने गुरुजी कथामला जिल्हा समिती सोलापूरच्या अंतर्गत ' साने गुरुजी शतकोत्तर रोप्यमहोत्सवी जयंती वर्षानिमित्त' सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. या स्पर्धेचे आयोजन प्रशालेतील मराठी विभाग प्रमुख नवोपक्रमशील शिक्षक, अखिल भारतीय साने गुरुजी कथामला शाखा कळंब अध्यक्ष सोपान पवार यांनी केले होते ही स्पर्धा आयोजित करण्याचा हेतू सध्याचे युग हे स्पर्धेचे विज्ञानाचे, ज्ञानाचे युग आहे.या स्पर्धेत विद्यार्थी उतरला पाहिजे टिकला पाहिजे प्रज्ञानवंत बनला पाहिजे विद्यार्थीना शालेय शिक्षणापासूनच स्पर्धा परीक्षेची गोडी अभिरुची निर्माण व्हावी, त्यांनी अशा स्पर्धेची तयारी करावी. प्रशालेतील विद्यार्थ्यांनी सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेला उदंड असा प्रतिसाद दिला . यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. ही स्पर्धा दोन विभागात घेण्यात आली अ गट पाचवी ते सातवी व ब गट आठवी ते दहावी या दोन गटात घेण्यात आली या दोन्ही गटातील एकूण विद्यार्थी 239 परीक्षेला बसले होते या परीक्षेला विद्यार्थ्यांनी उदंड असा प्रतिसाद दिला सहभाग नोंदविला. या दोन्ही गटातील प्रथम द्वितीय तृतीय व उत्तेजनार्थ गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. ही स्पर्धा अखिल भारतीय साने गुरुजी कथामला शाखा कळंब अध्यक्ष सोपान पवार, आनंद रामटेके, विक्रम मयाचारी, आप्पासाहेब वाघमोडे, शुभम जगताप, सुरज मडके आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# परतुरकर जनतेच्या नशिबी पुन्हा प्रभारीराज...

## मुख्याधिकारी व एसडीएमच्या अतिरिक्त पदभारामुळे कामे खोळंबली

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** येथील उपविभागीय अधिकारी भाऊसाहेब जाधव यांच्या निवृतीनंतर संबंधित पदाची अतिरिक्त जबाबदारी तहसीलदार प्रतिभा गोरे या गेल्या दोन महिन्यापासून संभाळत असताना आता गेल्या दहा दिवसापूर्वी परतूर पालिकेचे मुख्याधिकारी गंगाधर पेंटे यांची बदली झाल्याने सदरील पदावर पूर्णवेळ मुखाधिकारी अपेक्षित असताना या जागेवर अतिरिक्त मुख्याधिकारी म्हणून तीर्थपुरीचे मुख्याधिकारी परदेशी यांची नियुक्ती केल्याने हे दोन्ही जबाबदारीच्या पदावर आता पुन्हा प्रभारी राज चालू झाले आहे. याबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त करत पूर्णवेळ काम पाहणाऱ्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी केली आहे.

पालिकेला जास्त काळ पूर्णवेळ काम करणारे मुख्याधिकारी मिळाले नसल्याने शहरातील समस्यानी वर डोके काढल्याचे चित्र पाहायला मिळते. एक तर पालिकेवर प्रशाशक व त्यात मुख्याधिकारी पण पूर्णवेळ काम करणारा नसल्याने नागरिकांची कामे पालिकेत खोळंबली आहेत. यामुळे पालिकेतील कर्मचाऱ्यांवर वचक नसल्याने 'हम करे सो कायदा' या आविर्भावात जो तो वागाताना दिसत आहे. पालिकेत कामासाठी आलेल्या नागरिकांना कर्मचारी अधिकाऱ्याची वाट पाहत तासन तास वाट पाहावी लागत आहे. शहरात घाणीचे साम्राज्य पसरलेले असून, साथीच्या आजाराचा प्रादुर्भाव वाढलेला आहे. प्रभारी मुख्याधिकारी म्हणून परदेशीं यांनी पदभार स्वीकारून आठवडा उलटला. मात्र, त्यांनी नागरिकांच्या खोळंबलेल्या कामकाजाच्या कागदावर एकही स्वाक्षरी केली नसल्याने काम घेऊन आलेल्या नागरिकांत नाराजी व्यक्त होतांना दिसत आहे. तीर्थपुरी येथे पूर्ण वेळची जबाबदारी असल्याने या आठवडयातील दोन दिवस उलटूनही परदेशीं परतूर पालिकेत फिरकलेच नाही. जर असेच चालू राहिले तर नागरिकांच्या व शहरांतील समस्याचे काय असा संतप्त सवाल उपस्थित परतूर येथील तहसीलदार व उपविभागीय पद सांभाळताना तहसीलदार गोरे यांची मोठी तारांबळ होताना दिसून येत आहे.


प्रवेश देणे चालू आहे.

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल,मुंबई
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ,मुंबई मान्यता प्राप्त व संलग्नित
गीताई सेवाभावी शिक्षण संस्था संचलित

समर्थ GNM नर्सिंग स्कूल
शंकुतला ANM नर्सिंग स्कूल

प्रवेश देणे चालू आहे.

| उपक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता | कालावधी | पात्रता | वय |
| --- | --- | --- | --- | --- |
| G N M | 40 | 3 वर्ष | 12 वी पास ( विज्ञान,कला,वाणिज्य) | 18 ते 34 वर्ष |
| A N M | 20 | 2 वर्ष | 12 वी पास ( विज्ञान,कला,वाणिज्य) | 18 ते 34 वर्ष |

वैशिष्ट्ये
› सुसज्ज इमारत
› तज्ञ प्राध्यापक वृंद
› मुलींसाठी स्वतंत्र हॉस्टेलची व्यवस्था
› मागासवर्गीय मुलींसाठी स्कॉलरशीप लागु आहे.(SC,ST)
› नौकरीची 100% गॅरंटी
› प्रक्टिकलसाठी 100 खाटाच्या हॉस्पिटलशी संलग्न

मोफत प्रवेश...!

नांदेड रोड, मुदखेड ता. मुदखेड जि.नांदेड

Mob. 8766028429, 9922036771 , 9595614111

## इस्त्रायलची अट

आधुनिक केसरी

इस्त्रायल आणि हमासमध्ये सुरु असलेल्या युद्धात एक नवीन वळण आले आहे. हमासने जवळपास 150 लोकांना बंधक बनवून ठेवलय. इस्त्रायल आणि हमासमध्ये 7 ऑक्टोबरपासून लढाई सुरु आहे. हमासच्या दहशतवाद्यांनी दक्षिण इस्त्रायलमध्ये घुसून तांडव केले. रॉकेट हल्ला केला. 1 हजारपेक्षा जास्त इस्त्रायली नागरिकांचा मृत्यू झाला. त्याशिवाय दुसऱ्या देशाचे 100 पेक्षा जास्त लोक मारले गेले. हमासने अनेक लोकांना बंधक बनवलय. या कृत्यानंतर हमासचा जगभरात निषेध होत आहे. गाझा पट्टीत हमासच्या ठिकाणांना लक्ष्य केलं जातय. गाझा पट्टीत इस्त्रायली फायटर विमानांकडून सातत्याने बॉम्बफेक सुरु आहे. इस्त्रायलने हमासला मूळापासून संपवण्याची शपथ घेतली आहे. इस्त्रायलच्या या हवाई हल्ल्यात पॅलेस्टाइनमधील सर्वसामान्य नागरिकांचा सुद्धा मृत्यू होतोय. दहशतवाद्यांशिवाय महिला आणि मुलं सुद्धा आपल्या प्राणाला मुकतायत. इस्त्रायलने गाझा पट्टीतील पूर्ण नेटवर्क तोडून टाकले. वीज आणि पाणी पुरवठा खंडीत केला. पॅलेस्टिनी जनतेसमोर खाण्या-पिण्याचे संकट निर्माण झाला आहे. खरंतर हमासच्या दहशतवाद्यांनी इस्त्रायलच्या तुरुंगातील दहशतवाद्यांना सोडवण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना बंधक बनवल होते. पण आता उलटा गेम झाला. इस्त्रायलने पॅलेस्टाइनसमोर मोठी अट ठेवलीय. जो पर्यंत हमास इस्त्रायली बंधकांना सोडणार नाही, तो पर्यंत गाझामधील वीज-पाणी बंद राहील. इस्त्रायलने हे जे पाऊल उचलले, त्यावर टीका सुरु झालीय. पॅलेस्टाइन मुद्यावरुन बुधवारी अरब लीगच्या 22 देशांनी काहिरामध्ये इमर्जन्सी बैठक केली. त्यांनी इस्त्रायलसाठी फर्मान जारी केले. इस्त्रायलने गाझा पट्टीवरुन सर्व निर्बंध हटवावेत, असे अरब लीगच्या देशांनी एकमताने ठरवले. हमासने सर्वातआधी आमच्या बंधकांना सोडावे, त्यानंतर वीज-पाण्याचा पुरवठा सुरु होईल. हमासने जवळपास 150 लोकांना बंधक बनवून ठेवलय. यात इस्त्रायली नागरिकांशिवाय अमेरिकी सुद्धा आहेत. बंधकांच्या सुटकेसाठी बोलणी सुरु आहेत. इस्त्रायलने आता हमाससमोर अट ठेवलीय.

## ओबीसींचे जनक: डॉ. बाबासाहेब आंबेडकर


विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**सध्या ओबिसीची जनगणना, मराठा बांधवांना ओबीसी मधुन आरक्षण, ओबिसींना राजकीय आरक्षण असे मुद्दे खुपच गाजत आहेत. ओबिसी नेमकं कोणाला म्हणायचे हा प्रश्न देखील घटना समीतीच्या सदस्यां समोर पडला होता. त्याच वेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी एस एसी एस टी प्रवर्गाप्रमाणेच अजून एक वर्ग आहे जो सामाजिक व शैक्षणिक मागासलेला आहे. आणि त्यांना विकासाच्या प्रवाहात आणणे आवश्यक आहे. असे स्पष्ट मत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले परंतु ओबिसी नावाला खुपच विरोध झाला. तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी माघार घेतली नाही संविधानाच्या कलम क्रमांक तिनशे चाळीस मध्ये एस सी एस टी सोडून अजून एक मोठा समुह माघास आहे ते शोधुन त्यांना हक्क अधिकार द्यावे.**

एस सी एस टी सोडून जो मोठा समुह सामाजिक व शैक्षणिक दृष्टीने मागास आहे तोच ओबिसी समाज आहे. अशी ओळख निर्माण करून देऊन खऱ्या अर्थाने ओबिसी चे अस्तित्व निर्माण केले. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना व्यवस्थेच्या ठेकेदारांनी एका चौकटी मध्ये बंद करण्याचा प्रयत्न केला होता. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची मांडणी फक्त एका जातीशी भावनिक करून त्यांच्या कार्याचा आणि विचाराचा प्रचार आणि प्रसारच होऊ दिला नाही. उलटपक्षी डॉक्टर बाबाबासाहेब आंबेडकर यांचे यांचे विचार व कार्य मर्यादित करून काजव्याच्या प्रकाशाने सुर्य झाकण्याचा प्रयत्न येथील विषमतेने ग्रासलेल्या मानसिकतेने केलेला आहे. मुळ बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे कार्य जनतेसमोर येऊच नाही म्हणून एक वर्ग आजही सक्रिय आहे. परंतू परिवर्तनाची आणि प्रबोधनाची लाट जन सामान्यात उसळत असताना प्रत्येक जन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना जाणुन घेऊन त्यांच्या विचाराने काम करण्याचा प्रयत्न करत आहेत. हळूहळू जातीच्या चौकटीबाहेर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य जात असल्यामुळे समाजामध्ये सामाजिक समता, बंधुता निर्माण होण्याचे काम होत आहे. परंतु भारतातील बहुसंख्य असलेल्या ओबिसी बांधवानी अजून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना वाचले नाही अथवा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी आपुलकी नाही.

ओबिसी मधून आज अनेक लोक संविधानाचे अभ्यासक, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे प्रचारक झाले, अनेक तरुण तरुणी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी, विचारा विषयी प्रबोधन करत आहेत. हे परिवर्तनच मानावे लागेल. परंतु बहुसंख्य ओबीसी बांधवांना अजून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा गंधही नाही. याला अज्ञान म्हणाव कि द्वेष. भारत एकमेव असा देश आहे कि येथे संस्काराला, आणि प्रामाणिक पणाला खुप महत्त्व दिले जाते, संस्कार आणि प्रामाणिक पणा नसेल तर त्याला किंमत दिली जात नाही. जात धर्म काहीच नसुन मानव सर्वश्रेष्ठ आहे याची शिकवण देताना सुद्धां ज्या बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवाला माणसात आणले त्यांचे नाव सुद्धां घेतले जात नाही. आपल्या समस्या सोडविण्यासाठी कायदेशीर मार्गाने बाजु मांडणारे लोक खुप आहेत परंतु आम्हाला कायदेशीर हक्क अधिकार बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे मिळाले असे खूप कमी लोक आहे. आजही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना जातीच्या वा धर्माच्या चष्म्यातून बघने म्हणजे मानसिक अपंगत्वाचे लक्षण होय. बहुसंख्य समुहाला ओबीसी ची ओळख निर्माण करून देऊन प्रवाहामध्ये येण्यासाठी सर्व मार्ग खुले करून यशाची चाबी ओबीसी बांधवांना कडे दिली याची जानीवच ओबिसींना राहलेली नाही.

ओबिसी या प्रवर्गाला खूप लोकांचा विरोध होता. स्वतः ला राष्ट्रीय नेते समणाऱ्या लोकांनी सुद्धा ओबिसी म्हणजे नेमके कोण याचा प्रश्न उपस्थित केला होता. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी ओबिसी म्हणजे नेमके कोण आणि त्यांना



प्रवाहात आणणे का गरजेचे आहे हे पटवून देऊन ओबिसी प्रवर्गाची निर्मिती करून ओबिसींना विकासाच्या प्रवाहात आणण्याची गेट पास मिळवून दिली. ओबिसींना हक्क अधिकार मिळवून देऊन त्यांना प्रतिनिधित्व करण्याची कायदेशीर अधिकार देऊन त्यांचे संरक्षण करण्याची सुविधा सुद्धां उपलब्ध करून दिली. ओबिसीं प्रवर्गाने प्रवाहात येऊन स्वतः चे अस्तित्व टिकवून ठेवण्याची सुविधा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी करून दिली आहे. ओबिसीच्या नावाखाली करोडो लोक मालामाल होऊन आज माना सन्मानाचे जिवन जगत आहेत परंतु त्यांना ओबिसींच्या उद्धारकर्त्याची जाणीव नाही वा जाती व्यवस्थेमुळे आणि विषमतेमुळे त्यांनी उद्धारकर्त्याला जवळ केलेच नाही. कित्येक लोकांना आपण ओबिसी आहोत आणि ओबिसींना सर्व क्षेत्रात यशस्वी होण्याचा अधिकार आहे हे ही सुद्धा माहिती नाही. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी ओबिसींना राजा होण्याची संधी निर्माण करून दिली आहे परंतु फक्त जातीव्यवस्था आणि मानसिक गुलामगिरी मुळे ओबिसींनी बाबासाहेब समजून घेतले नाही म्हणून स्वतः देशाचा राजा असताना सुद्धा आपल्याच हक्क अधिकाराची जाणीव नसल्याने ओबीसी आजही मागासलेले राहिले असून ओबीसी राजा दुसऱ्याला मागत आहे. जर ओबिसींना स्वतः च्या अस्तितवाची जाणीव होत नसेल तर आजही मानसिक गुलामगिरी मध्ये आहेत असेच समजावे. ओबिसींना स्वतः चे अस्थित्व डॉक्टर बाबासाहेब यांनी निर्माण करून दिले तरी बहुसंख्य ओबिसी आजही निद्रीस्त अवस्थेत आहेत. आजही ओबिसी जर जागा झाला तर देशाचा राजा होईल. ओबिसींना अजून राजा हि संकल्पना च कळाली नाही कारण ज्या बहुसंख्य ओबिसी यांना राजा होण्याचा अधिकार आहे तो ओबिसीं आजही मानसिक गुलामगिरी मध्ये खितपत पडलेला आहे. मानसिक गुलामी तोडण्यासाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम असल्याने शिक्षणाचे दार उघडून ओबिसींना शिक्षणाची सुविधा करून दिली. परंतु ओबिसीं या प्रवर्गाने शिक्षण घेतले पण तर्कवाद आणि सत्यता असलेले शिक्षण त्यांना मिळाले नाही. म्हणून आजही ओबिसी हक्क अधिकार यापासून दुर आहेत. सुशिक्षित ओबिसीं यांनी जागृत ओबिसींना जर वैचारिक आणि सामाजिक मदत केली तर एका दिवशी ओबीसी समुह राजा बनतो एवढी ताकत या समुहामध्ये आहे. परंतू हळूहळू या ओबिसींना हक्क अधिकारा पासून दुर नेऊन ते कमी करण्याचे कट कारस्थान व्यवस्था करत आहे.

ओबिसींनी आपला ईतिहास वाचून सध्याच्या सध्याच्या परिस्थिती किडे बघितलं तर अमुलाग्र बदल घडलेला आहे. याचे सर्व श्रेय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना जाते. इतिहास आणि वर्तमान स्थिती काय बदल झालेला आहे याची जाणीव होईल. हा बदल होण्यासाठी कोण कारणीभूत आहे हे स्विकारने गरजेचे आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणजे जिवन जगण्याची पद्धत आहे. आणि ही पद्धत ओबिसींना राजा बनवून सोडते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे शिक्षण, नोकरी, हक्क अधिकार, आरक्षण आणि संरक्षण मिळाले. म्हणून ओबीसी वर्ग आज स्वाभिमानाने उभा व टिकून आहे. बऱ्याच सुशिक्षित नोकरदार ओबिसींना आपल्याला सुद्धां हक्क अधिकार, आणि आरक्षण आहे, ओबिसीं सुद्धां सामाजिक मागासलेला आहे याची जाणीव नाही. तो जागृत नाही. जागृत लोकांनी ओबिसींना आजही जागृत करून स्वतः च्या अस्तित्वाची व स्वाभिमानाची जाणीव करून देणे गरजेचे आहे. ओबीसी बांधवांचे अज्ञान आणि मानसिक गुलामी यामुळे ओबीसी आजही आपल्या हक्क अधिकारांचे रक्षण करण्यास अपयशी ठरत आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना खऱ्या अर्थाने मानवंदना द्यायची असेल तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार ओबिसीं बांधवामध्ये पेरून ओबिसींना जागृत करणे गरजेचे आहे. तर बाबासाहेब आंबेडकर यांना खरी मानवंदना दिली याचे सार्थक होईल. आज पर्यत मर्यादित बाबासाहेब आंबेडकर यांची मांडणी करणाऱ्या लोकांनी आता थोड थांबुन अगोदर स्वतः डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समजून घेणे गरजेचे आहे. ओबिसी यांनी स्वतः चे अस्तित्व, महत्त्व व ताकद लक्षात घेऊन जागृत होणे आवश्यक आहे. पुर्वी पासून चालत आलेली विशिष्ट वर्णाची गुलामगिरी व त्यांनी पसरवलेला अंधविश्वास याला बाजूला सारून, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची व्यापक स्वरुपात मांडणी करून ओबिसींच्या घरात बाबासाहेब व डोक्यात बाबासाहेब पोहचवण्याचा प्रयत्न करू जनेकरून प्रत्येक भारतीयांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे कार्य माहिती होऊन एकसंघ राष्ट्र निर्माण होण्यास मदत होईल व समता व मानवतेचा शत्रु समजून येईल. भिमरायांना अभिवादन करूया, चला ओबिसींना राजा बनवुया.

## किशोर कुमार : चित्रपटसृष्टीला लाभलेले अनमोल रत्न


श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज स्मृतिदिन. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या.**

त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत



सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व



चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. किशोर कुमार यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सडा, रांगोळी, फुलांची उधळण करत महिलांनी केले औक्षण

## मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचा 12 दिवसांच्या दौऱ्याचा समारोप

आधुनिक केसरी न्यूज

**अविनाश घोगरे**

**घनसावंगी :** मराठा समाजाला सरसकट कुणबी आरक्षणाच्या मागणीसाठी सरकारला दिलेल्या 40 दिवसांच्या मुदतीनंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आपला मराठा गाठी भेटी 12 दिवसांच्या दौऱ्याला अंबड येथील सभेपासून दि. 30 सप्टेंबर रोजी केली होती. आज दि. 12 रोजी अखेर पहाटे पहाटे 3 वाजून 30 मिनिटाच्या सुमारास या दौऱ्याचा समारोप करून अंतरवाली सराटी येथे आगमण झाले. गांवात महिलांनी सडा टाकला होता,रांगोळी काढल्या तसेच फुलांची उधळण करून शेकडो महिला बघिणींनी औक्षण करून अख्या गावाने मनोज जरांगे पाटील यांचे मनोभावे स्वागत केले.अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटी येथे आपला 12 दिवसांचा महाराष्ट्रातील मराठा गाठी भेटी दौरा आटोपून पहाटे 3 वाजून 30 मिनिटांच्या सुमारास अंतरवाली सराटी येथे आगमन होताच गावांत पहाटेच्या सुमारास सडा, रांगोळी, फुलांची उधळण करून महिला बघिणी शेकडोच्या संख्येने औक्षण करण्यासाठी उभ्या होत्या. संपूर्ण गावाने मनोज जरांगे पाटील यांचे जल्लोषात स्वागत केले. अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटी येथे दि. 29 ऑगष्ट रोजी मनोज जरांगे पाटील यांनी शहागड येथील आपली सभा घेतल्यानंतर आमरण उपोषण सुरु केले. शांततेत सुरु असलेल्या या आमरण उपोषणाला दि.1 सप्टेंबर रोजी पोलिसांकडून झालेल्या अमानुष लाठी हल्ला तसेच गोळीबाराचे गालबोट लागल्याने महाराष्ट्र पेटून उठला. आणी दि.2 सप्टेंबर पासून राज्यातील सर्व पक्षाचे प्रमुख, राजे, केंद्रीय मंत्री तसेच राज्यमंत्री, खासदार,आमदार तसेच विविध संघटना यांनी येऊन मनोज जरांगे यांच्या भेटी घेतल्या. तसेच सुरु असलेले उपोषण मागे घेण्यासाठी मंत्री गिरीश महाजन,मंत्री संदीपान भुमरे, पालकमंत्री अतुल सावे, माजी मंत्री आ.राजेश टोपे, माजी मंत्री अर्जुन खोतकर, आ. नारायण कुचे यांनी तीन ते चार वेळा उपोषण सोडविण्यासाठी सरकारकडून मध्यस्थी करण्यात आली. मात्र सरकारला दिलेल्या अटी मान्य झाल्यावरच उपोषण सोडविण्यात येईल, असे जरांगे यांच्या वतीने सांगण्यात आले. सरकारच्या वतीने दस्तरखुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणी सर्व शिष्ट मंडळ यांनी उपोषणाच्या 17 व्या दिवशी दि.15 सप्टेंबर रोजी आंदोलक मनोज जरांगे यांची भेट घेऊन 30 दिवसांत मराठा आरक्षण देण्याचे मान्य करून उपोषण सोडविण्यात आले. परंतु आंदोलक मनोज जरांगे यांनी यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांना 30 दिवसांचा अवधी कमी पडत असेल तर अजून 10 दिवस पुन्हा वेळ घ्या. मात्र आम्हाला कोर्टात



टिकणारे आरक्षण द्या अशी मागणी लावून धरली. मी आता उपोषण जरी सोडले असले तरी मात्र मी ही जागा सोडणार नाही. येथे आम्ही आरक्षण मिळे पर्यंत साखळी उपोषण करणार असल्याचे सांगितले होते. अंतरवाली सराटी येथे दि.16 सप्टेंबर पासून पुन्हा उपोषण उपोषणाला सुरुवात झाली. आणी मग 30 सप्टेंबर रोजी 12 दिवसांचा मराठा गाठी भेटी दौऱ्याला मनोज जरांगे पाटील यांच्याकडून 25 गाड्यांच्या ताफ्यासह अंबड पासून सुरुवात करण्यात आली. या 12 दिवसांच्या दौऱ्यात प्रत्येक ठिकाणी मनोज जरांगे यांचे जल्लोषात स्वागत झाले. मनोज जरांगे यांनी आपल्या मराठा बांधवांना हात जोडून विनंती केली की, मला आरक्षण तुमच्यासाठी घ्यायचे आहे. आणी आता यापूढे आत्महत्या व्हायला नकोत. तसेच 14 ऑक्टोबरची होणारी अंतरवाली सराटी येथील सभा ही सरकारला निर्णय घेणारी सभा ठरणार असल्याने सर्वांनी या सभेसाठी यायचे आहे. असे आवाहन प्रत्येक सभेत करण्यात आले. 14 ऑक्टोबरला अंतरवाली सराटी येथे होणाऱ्या ऐतिहासिक सभेसाठी जेथून लढा सुरु झाला आहे. त्या 123 गावांतील लोक वर्गनीतूनच आपली सभा झाली पाहिजे हा निर्णय मनोज जरांगे पाटील यांनी पंढरपूर येथे घेतला. आणी यासाठी 5 लोकांच्या शिष्टमंडळाची अधिकृत नियुक्ती देखील करण्यात आली. जर हा निधी कमी पडत असेल् तर माझे घर देखील विक्री करा असे जरांगे पाटील यांनी सांगितले. 14 ऑक्टोबर रोजी अंतरवाली सराटी येथे आधी 100 एकर जागेचे नियोजन करण्यात आले होते. परंतु जागा अपुरी पडायला नको म्हणून पुन्हा जागा वाढविण्यात आली आहे. सभा होणाऱ्या ठिकाणची आयजी, पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी,उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांनी पाहणी केली आहे. मात्र सभेला निश्चित किती जनसमुदाय येईल. याचा मात्र अंदाज अद्याप कोणालाही बांधता येत नाही.

मराठा आरक्षणासाठी अंतरवाली सराटी येथे आयोजित सभेची तयारी अंतिम टप्प्यात आहे. सभेसाठी ठिकठिकाणी स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच सभेला येणाऱ्या सर्व मार्गावर चहा,पाणी,नाश्ता,थंडपेय,बिसलेरी तसेच फ्रुटची ठिकठिकाणी काही समाजिक संस्था तसेच समाज बांधवांकडून करण्यात आलेली आहे. त्याच प्रकारे अंबड शहरात रात्री मुक्कामी राहण्याची तसेच जेवणाची देखील मारवाडी समाजाच्या वतीने व्यवस्था करण्यात आलेली आहे.

# खुनाची घटना ताजी असतानाच दुसरा खून झाल्याने तालुका हदरला

आधुनिक केसरी न्यूज

**विलास कांबळे**

**येवला :** गेल्या सहाच दिवसापूर्वीच नांदगाव तालुक्यातील



न्यायडोंगरी गावात एका पत्नीने आपल्या अल्पवयीन मुलाच्या साह्याने आपल्याच नवऱ्याचा खून केल्याची घटना ताजी असतानाच आज पुन्हा न्यायडोंगरी गावात दुसरा खूनाचा गुन्हा दाखल झाल्याने न्यायडोंगरीसह तालुका हादरून गेला आहे. .

मयत डॉक्टर भाग्यश्री किशोर शेवाळे वय वर्ष 27 राहणार न्यायडोंगरी हीचा दगडाने ठेचून व काचेची बाटली मारून ( खून ) जिवे ठार मारले अशी फिर्याद मयत डॉक्टर भाग्यश्री किशोर शेवाळे हीचा भाऊ सचिन कैलास साळुंखे राहणार तितरखेडा तालुका वैजापूर जिल्हा छत्रपती संभाजी नगर हल्ली मुक्काम रॉयल लॉन्स च्या बाजूला वाळुंज तालुका जिल्हा छत्रपती संभाजी नगर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार नांदगाव पोलीस स्टेशनला गुन्हा रजिस्टर नंबर CCTNS ४४५/२०२३ भादवी कलम ३०२,३०४ (ब) ३४ प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेल्या पाच ऑक्टोबर रोजी न्यायडोंगरी गावात एका पत्नीने आपल्या अल्पवयीन मुलाच्या सहाय्याने नवऱ्याला ठार केले तर आजच्या या गुन्ह्यात डॉक्टर नवऱ्याने त्याच्या बापाच्या सहाय्याने डॉक्टर असलेली पत्नी भाग्यश्री हिला दगडाने ठेचून ठार मारले अशा आशयाची फिर्याद दिल्याने न्यायडोंगरी गावात उलट सुलट चर्चेला उधानआले आहे.

याबाबत सविस्तर हकीगत अशी की गेल्या २७ सप्टेंबर रोजी संध्याकाळी साडेसहा ते रात्री अकरा चे दरम्यान मन्याड फाटा या ठिकाणी दुचाकीचा अपघात झाल्याचा बनाव करून डॉक्टर भाग्यश्री ही मयत झाल्याचे सांगितल्याने चाळीसगाव पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यू गुन्हा नंबर ००/२०२३ CRPC १७४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता परंतु सदरचे घटनास्थळ नांदगाव पोलीस स्थानकाच्या हद्दीत येत असल्याने सदरचा गुन्हा ०० नंबर ने नांदगाव येथे वर्ग करण्यात आला होता, परंतु काल तब्बल १५ दिवसानंतर मयत डॉक्टर भाग्यश्री हिचा भाऊ सचिन कैलास साळुंखे याने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, माझी बहीण भाग्यश्री हिच्याकडे पती डॉक्टर किशोर नंदू शेवाळे व तिचे सासरे नंदू राघो शेवाळे हे नेहमी तू तुझ्या माहेरून घर व दवाखाना बांधण्यासाठी २५ लाख रुपये घेऊन ये अशी मागणी वेळोवेळी करीत होते परंतु सदरची मागणी भाग्यश्री हिच्याकडून पूर्ण न झाल्याने केवळ पंचवीस लाखा रुपयांसाठी आरोपी डॉ किशोर नंदू शेवाळे व त्यांचे वडील नंदू राघो शेवाळे यांनी संगनमताने व विचारपूर्वक फिर्यादीची बहीण डॉक्टर भाग्यश्री हिस दगडाने ठेचून व काचेची बाटली मारून जीवे ठार मारल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या घटनेचा तपास उप उपविभागीय पोलीस अधिकारी मनमाड सोहेल शेख यांच्या मार्गदर्शनाखाली नांदगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रीतम चौधरी उपनिरीक्षक नितीन खंडागळे, मनोज वाघमारे, संतोष बहाकर हे करीत आहेत.

# नाशिकमध्ये पाण्यात बुडून दोन जणांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** जिल्ह्यात दोन घटनांमध्ये एक अल्पवयीन तसेच २७ वर्षाच्या युवकाचा बुडून मृत्यू झाला. आघार येथील सुभाष गायकवाड (२७) हा परिसरातील सुदर्शन तोरणे यांच्या विहिरीत मृतावस्थेत आढळला. त्याचा भाऊ दीपकने सुभाष यास मालेगाव सामान्य रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी मालेगांव तालुका पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. दुसरी घटना सिन्नर तालुक्यात घडली. पंचाळे शिवारातील धमेंद्र जगताप (१७) हा फर्दापूर येथील देवनदी पात्रातील बंधाऱ्यातील पाण्यात पडल्याने मयत झाला. याबाबत वावी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बँक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

CAFÉ ROCKSTARZ EAT. CHILL. REPEAT
11:11 ELEVEN ELEVEN Where Dishes come True..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# भारताची नवी मुत्सद्देगिरी



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**गेल्या चार दिवसापासून हमास आणि इस्लाममध्ये संघर्ष पेटला आहे अनेक देशांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे अमेरिकेने या हल्ल्याचा निषेध करत इस्त्राला पाठिंबा दिला आहे. मध्यपूर्वेतील इस्लामिक देश पॅलेस्टाईनच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे दिसत असून पॅलेस्टिनींसाठी स्वतंत्र राष्ट्राची मागणी करत आहेत. मात्र, यूएई, बहारीन, मोरोक्को या काही इस्लामिक देशांचा दृष्टिकोन आता इस्रायलकडे बदलत आहे. यूएई आणि बहरीनने या हल्ल्यासाठी हमासचा निषेध केला आहे. भारतातही या प्रकरणाची राजकीय चर्चा तीव्र झाली आहे कारण भारत परंपरेने पॅलेस्टाईनला पाठिंबा देत आहे पण मोदी सरकार उघडपणे इस्रायलच्या पाठीशी उभे असल्याचे दिसत आहे.**

भारताने ज्या गतीने या मुद्द्यावर प्रतिक्रिया दिली आणि इस्रायलची बाजू घेतली, तो मोदी सरकारच्या इस्रायल-पॅलेस्टाईनबाबतच्या धोरणात झालेला बदल म्हणून अनेक विश्लेषकांनी पाहिले आहे. अशा संकटात भारत कोणत्याही एका देशाची बाजू घेत नाही, पण यावेळी भारताने लगेच इस्रायलची बाजू घेतली आहे. यापूर्वी भारताने पॅलेस्टाईनच्या कोणत्याही हल्ल्याला दहशतवादी हल्ला म्हणून संबोधित केले नव्हते. दरम्यान भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील हवास इस्रायल संघर्षावर भारताची भूमिका स्पष्ट केली आहे .पॅलेस्टाईनशीही भारताचे संबंध चांगले राहिले आहेत. भारतातील काही लोक पॅलेस्टाईनला पाठिंबा देण्याचे बोलत असताना पंतप्रधानांनी इस्रायलला भारताचा पाठिंबा व्यक्त केला आहे. शेवटी, कारण काय आहे? भारत इस्रायलसोबत उघडपणे आला, ही काय नवी मुत्सद्देगिरी आहे काय? या संदर्भातील माहिती पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंट वरून पोस्ट करत दिली आहे भारतीय जनता इस्त्राईलच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे असे पंतप्रधान मोदी यांनी म्हंटले आहे. भारत दहशतवादाच्या सर्व प्रकारांचा आणि प्रगती करण्याचा तीव्र आणि निशानिग्धपणे निषेध करतो असेही पंतप्रधान मोदी यांनी म्हटले आहे. भारताने वारंवार स्पष्ट केले आहे की कोणत्याही प्रकारचा दहशतवाद भारत खपवून घेणार नाही. आणि ज्या प्रकारचा हल्ला झाला आहे, हमास हा नॉन-स्टेट एक्टर दहशतवादी गट आहे, ज्याला जगातील कोणताही देश ओळखत नाही अशा दहशतवादी गटांच्या यादीत समाविष्ट आहे. आणि त्यांनी या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे आणि ज्या प्रकारे हा हल्ला झाला ते स्वतःच अनपेक्षित आहे. जमिनीपासून हवेपर्यंत, एका नॉन-स्टेट ॲक्टरने एवढी क्षमता संपादन केली आहे की त्याने एवढा मोठा हल्ला केला आहे. त्यामुळे जगासाठीही हा चिंतेचा विषय ठरावा आणि त्यामुळेच भारता याचा निषेधही करत आहे, असे भारताच्या पंतप्रधानांनी म्हटले आहे, उलट, या हल्ल्याला कोणत्याही प्रकारे कायदेशीरपणा दिला गेला, तर त्याचे सर्व देशांवर दूरगामी परिणाम होतील, हे स्पष्टपणे इस्रायलच्या पाठीशी उभे आहे. त्यामुळेच भारताने हा मुद्दा जोरदारपणे मांडला आहे. शनिवारी (७/१०/२३) पहाटे हमासने इस्रायलवर हल्ला केला, त्यानंतर काही तासांनंतर पंतप्रधान मोदींनी हमासच्या हल्ल्याला दहशतवादी हल्ला म्हणून संबोधले आणि या कठीण काळात भारत इस्रायलच्या पाठीशी उभा असल्याचे सांगितले. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी पंतप्रधान मोदींशी फोनवर चर्चा केली. या संभाषणात पंतप्रधान मोदींनी पुन्हा एकदा भारत इस्रायलच्या पाठीशी असल्याचा पुनरुच्चार केला आणि प्रत्येक प्रकारच्या दहशतवादाचा तीव्र निषेध करतो.

मध्यपूर्वेतील इस्लामिक देश पॅलेस्टाईनच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे दिसत असून पॅलेस्टिनींसाठी स्वतंत्र राष्ट्राची मागणी करत आहेत. मात्र, यूएई, बहारीन, मोरोक्को या काही इस्लामिक देशांचा दृष्टिकोन आता इस्रायलकडे बदलत आहे. यूएई आणि बहरीनने या हल्ल्यासाठी हमासचा निषेध केला आहे. भारतातही या प्रकरणाची राजकीय चर्चा तीव्र झाली आहे कारण भारत परंपरेने पॅलेस्टाईनला पाठिंबा देत आहे पण मोदी सरकार उघडपणे इस्रायलच्या पाठीशी उभे असल्याचे दिसत आहे. सहसा अशा प्रकरणांमध्ये भारताचे परराष्ट्र मंत्रालय विधान जारी करते, परंतु तसे करण्याऐवजी पंतप्रधान मोदींनी लगेच ट्विट केले आणि म्हटले की, 'इस्रायलवरील दहशतवादी हल्ल्यामुळे खूप धक्का बसला आहे. आमच्या प्रार्थना निष्पाप पीडित आणि त्यांच्या कुटुंबियांसोबत आहेत. पंतप्रधानांचे हे ट्विट परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनीही रिट्विट केले आहे. इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांच्याशी झालेल्या फोनवरील संभाषणाबद्दल पंतप्रधान मोदींनीही ट्विट केले आहे. मंगळवारी एका ट्विटमध्ये पीएम मोदींनी लिहिले की, 'पंतप्रधान नेतन्याहू यांनी मला फोन केला आणि मला परिस्थितीबद्दल नवीनतम माहिती दिली, ज्यासाठी मी त्यांचे आभार मानतो. या कठीण काळात भारतीय जनता इस्रायलच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. भारत सर्व प्रकारच्या दहशतवादाचा तीव्र आणि निःसंदिग्धपणे निषेध करतो. भारताने ज्या गतीने या मुद्द्यावर प्रतिक्रिया दिली आणि इस्रायलची बाजू घेतली, तो मोदी सरकारच्या इस्रायल-पॅलेस्टाईनबाबतच्या धोरणात झालेला बदल म्हणून अनेक विश्लेषकांनी पाहिले आहे. अशा संकटात भारत कोणत्याही एका देशाची बाजू घेत नाही, पण यावेळी भारताने लगेच इस्रायलची बाजू घेतली आहे. यापूर्वी भारताने पॅलेस्टाईनच्या कोणत्याही हल्ल्याला दहशतवादी हल्ला म्हणून संबोधित केले नव्हते. पॅलेस्टाईनच्या पाठीशी उभ्या असलेल्या भारताने इस्रायलला पाठिंबा का दिला? भारत आणि इस्रायल किती जवळ आले आहेत हे पंतप्रधान मोदींच्या वक्तव्यावरून दिसून येते. एक काळ असा होता की भारत इस्रायलपासून अंतर राखत असे. १९४८ मध्ये स्थापन झालेल्या इस्रायलशी भारताने चार दशकांहून अधिक काळ राजनैतिक संबंध प्रस्थापित केले नाहीत. भारताचे



पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंसह त्या काळातील सर्व नेत्यांचा असा विश्वास होता की कोणताही देश धर्माच्या आधारावर बांधला जाऊ नये. आणि ज्यूबहुल इस्रायलची निर्मिती केवळ धर्माच्या आधारे झाली. पॅलेस्टाईनच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन या संघटनेला मान्यता देणारा भारत हा पहिला बिगर अरब देश होता. पण इस्रायलला मान्यता मिळायला खूप वेळ लागला. इस्रायलला मान्यता देणारा भारत हा शेवटचा बिगर मुस्लिम देश ठरला. भारताने सप्टेंबर १९५० मध्ये इस्रायलला राष्ट्र म्हणून मान्यता दिली. मात्र त्यानंतरही भारत इस्रायलच्या विरोधात राहिला. १९५६मध्ये जेव्हा सुएझ कालव्याचा वाद झाला तेव्हा भारत इस्रायलच्या विरोधात इजिप्तच्या पाठीशी उभा होता. १९६७ मध्ये जेव्हा इस्रायल आणि पॅलेस्टाईनमध्ये ६ दिवसांचे युद्ध झाले तेव्हाही भारताने पॅलेस्टाईनला पाठिंबा दिला होता. पॅलेस्टिनींच्या न्याय्य हक्कांचे समर्थन करत असल्याचे भारताने म्हटले होते. पॅलेस्टाईनच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन (PLO) या संघटनेला मान्यता देणारा भारत हा पहिला बिगर अरब देश होता. १९७५ मध्ये पीएलओला मान्यता दिल्यानंतर भारताने दिल्लीत पॅलेस्टाईनचा दूतावास उघडण्यासही परवानगी दिली. इस्रायलबाबत भारताचा संकोच कधी कमी झाला?

इस्रायलला मान्यता देण्यासाठी भारताला बराच वेळ लागला. १९५० मध्ये इस्रायलला मान्यता देणारा भारत हा शेवटचा बिगर मुस्लिम देश होता. १९५३ मध्ये इस्रायलला मुंबई, भारत येथे आपले वाणिज्य दूतावास उघडण्याची परवानगी देण्यात आली होती परंतु नवी दिल्ली येथे दूतावास उघडण्याची परवानगी नव्हती. इंदिरा गांधींनी पॅलेस्टाईनशी संबंध पुढे नेले आणि त्यांच्यानंतर राजीव गांधींनीही पॅलेस्टाईनला पाठिंबा दिला. पण १९८० च्या दशकाच्या शेवटच्या वर्षांमध्ये आणि १९९० च्या दशकाच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये, भारतातील अनेकांना हे समजले की गेल्या दोन दशकांपासून अरब देशांसह भारत पॅलेस्टाईनला पाठिंबा देत आहे, परंतु जेव्हा भारताच्या समर्थनाचा प्रश्न येतो तेव्हा अरब देश एक पर्याय स्वीकारतात. तटस्थ भूमिका.भारत-चीन युद्धात अरब देश तटस्थ राहिले आणि १९७५ च्या भारत-पाक युद्धात अरब देशांनी उघडपणे पाकिस्तानला पाठिंबा दिला. या गोष्टीने विशेषतः भाजपला खूप अस्वस्थ केले. दुसरीकडे, १९६२आणि १९६५ च्या युद्धात इस्रायलने भारताला शस्त्रास्त्रांची मदत केली. इराकने १९९०मध्ये कुवेतवर हल्ला केल्यावर इस्रायलबद्दलच्या भारताच्या भूमिकेत मोठा बदल झाला. या काळात पीएलओने इराकी नेता सद्दाम हुसेनला पाठिंबा दिला, त्यामुळे पीएलओला मिळालेला राजकीय फायदा गमावला. याच काळात सोव्हिएत रशियाचेही विघटन झाले. या सर्व जागतिक घटनांमुळे भारताला आपल्या परराष्ट्र धोरणात मोठे बदल करण्याची प्रेरणा मिळाली. या संदर्भात भारताने ज्यू राष्ट्राला मान्यता दिल्यानंतर ४० वर्षांनी १९९२मध्ये इस्रायलशी पूर्ण राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. पंतप्रधान मोदींच्या आगमनाने इस्रायल-भारत संबंध अधिक दृढ झाले. इस्रायलशी राजनैतिक संबंध प्रस्थापित झाल्यानंतरही भारताने अनेक प्रसंगी इस्रायलवर टीका करणे सुरूच ठेवले. २००६ च्या लेबनॉन युद्धादरम्यान भारताने इस्रायलला बेजबाबदारपणे बळाचा वापर थांबवण्याचे आवाहन केले होते. यानंतर 2014 च्या गाझा युद्धात भारताने इस्रायल आणि पॅलेस्टाईनमध्ये चर्चेची वकिली केली होती. तेव्हा भारताने पॅलेस्टिनींसाठी वेगळ्या राष्ट्राची चर्चा केली होती. २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेवर आल्यानंतर भारत-इस्रायल संबंधांमध्ये ऐतिहासिक बदल झाला. भारत आणि इस्रायल हे नैसर्गिक मित्र आहेत, असा भाजपचा नेहमीच तर्क आहे. याउलट, पूर्वीच्या बिगर-भाजप सरकारांनी असा युक्तिवाद केला होता की मुस्लिम लोकसंख्येमुळे भारताला इस्लामिक देशांची बाजू घ्यावी लागली.

पीएम मोदी आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्यातील वैयक्तिक संबंध खूप मजबूत मानले जातात. पंतप्रधान मोदींपूर्वी भारताच्या कोणत्याही पंतप्रधानाने इस्रायलला भेट दिली नव्हती. २०१७ मध्ये पीएम मोदी इस्रायलला भेट देणारे पहिले भारतीय पंतप्रधान बनले. दोन्ही देशांनी व्यापार, कृषी, संस्कृती आणि संरक्षण क्षेत्रात आपले सहकार्य वाढवले आहे.गेल्या काही वर्षांत भारत आणि इस्रायलने अनेक संयुक्त लष्करी सराव केले आहेत. नेतन्याहू यांनी २०१८ मध्ये भारताला भेट दिली होती. या भेटीनंतर भारत-इस्रायलने अंतराळ, माहिती आणि दहशतवादाच्या क्षेत्रातही सहकार्य वाढवले. इस्रायल आणि भारत 2021 मध्ये स्थापन झालेल्या I2U2 गटाचा भाग आहेत आणि भारताने अलीकडच्या काळात इस्रायलच्या विरोधात संयुक्त राष्ट्राच्या अनेक ठरावांपासून दूर राहिले आहे.

# प्राणिमात्रांची काव्यमय ओळख : 'एलियन आला स्वप्नात'



उमेश मोहिते
संपर्क ७६६६१८६९२८

आधुनिक केसरी

**प्रसिद्ध बालसाहित्यकार डॉ. सुरेश सावंत लिखित ' एलियन आला स्वप्रात ' हा देखणा बालकवितासंग्रह नुकताच चेतक बुक्स,पुणे यांनी प्रकाशित केलेला असून यात एकूण एकोणतीस सुंदर कविता आहेत आणि त्यातील बहुतांशी बालकविता बालकिशोरांच्या भावविश्वात विशेष कुतुहल नि आकर्षण असलेल्या विविध पक्षी नि प्राण्यांविषयी असून कवी सुरेश सावंत यांनी त्या सर्वांचा ; त्यांच्या सर्व गुणवैशिष्ट्यांसहित सार्थ परिचय सहज सोप्या भाषेत अगदी सहजसुंदरतेने या कवितांमधून करून दिला आहे. उदा.मगर या हिंस्त्र नि भयंकर प्राण्याला डायनॉसोरची बहीण अशी नेटकी उपमा देऊन त्याची नेमकी ओळख करून देताना कवी म्हणतो :**

**राखाडी, करडा, काळपट रंग**
**टणक, बुलेटप्रूफ तुमचे अंग**
**बेसावध प्राण्यावर करी हल्ला**
**जबडा वासून मारता डल्ला**

.. अगदी अशीच सागरकिनारी आढळून येणाऱ्या पेंग्विन या पक्षाची अनोखी माहिती ' पेंग्विनदादा ' या कवितेतून सांगताना कवी लिहितो :

**पेंग्विनदादा,पेंग्विनदादा**
**बर्फाळ प्रदेशात तुमची वस्ती**
**पाण्यावर आणि पाण्याखाली**
**खूप करता धिंगा-मस्ती !**

... तर ' जिराफदादा ' या कवितेत जिराफ या महाकाय प्राण्याचा आकार,त्याचे खाद्य,राहणीमान इत्यादिंविषयी सांगून त्या प्राण्याकडून मुलांसहित आपण सर्वांनी काय बोध घ्यावा,हे कल्पकतेने सांगताना कवी म्हणतो : **सर्वात उंच प्राण्याकडून ह्या**
**तुम्ही आम्ही शिकायचे काय ?**
**डोके आभाळाला भिडले तरी**
**जमिनीवरच असावेत पाय ..**

... आपण सारेजण ' गाढव ' हा शब्द नेहमी एखाद्या शिवीसारखा आळशी,कामचुकार आणि बुद्धू व्यक्तीसाठी सतत वापरतो.आम्हास हे मात्र ठाऊक नसते की,आमचे हे वर्तन आपल्यासाठी गुमानपणे जीवतोड ढोरमेहनत करणाऱ्या सद्गुणी गाढवाचा अपमान करणारे असते ; असे नोंदवून कवी त्याच्या अंगी असलेल्या सद्गुणांची महती गाताना पुढे म्हणतो : **गाढवाच्या अंगी असते**
**अनेक सद्गुणांची खाण**
**आळशाला ' गाढव ' संबोधणे**
**हा तर गाढवाचा अपमान**

.. अगदी अशीच ' एलियन आला स्वप्नात ' ही शीर्षकविता परग्रहावरील प्राण्याची चित्रमय शैलीत ओळख देणारी असून तीमधून मुलांच्या मनातील एलियनविषयीचे आकर्षण नेमकेपणाने टिपताना कवी म्हणतो :

**एलियन माझ्या स्वप्नात आला**
**मला म्हणाला ' चल रे भाऊ**



**एका जागी कंटाळला आहेस**
**छानपैकी चंद्रावर फिरून येऊ '**


.. अगदी अशाच या संग्रहातील ' एकशिंगी गेंडा ', ' देवमासा , ' मुंगूसमामा ' , ' पावश्या पक्षी ' , ' अप्पू अस्वल ' , ' घू S घू S घुबड ' , ' काटेरी साळींदर ' आणि ' हसरा प्राणी ' या कविताही रंगतदार आणि वाचनीय आहेत.

.. याशिवाय या संग्रहात बालकिशोरांना त्यांच्या भावविश्वाची प्रतिती देऊन त्यांना खूपच मौज-मजा वाटेल अशा निखळ आनंद देणाऱ्याही गमतीदार आणि रंजक कविता संग्रहात आहेत.उदा.' लाडका लाडोबा ' या कवितेत सर्वांच्या लाडक्या लाडोबाच्या साऱ्या करामती नि गमती-जमती सांगून शेवटी कवी लिहितो :

**लाडक्या या लाडोबाचा**
**रात्रंदिवस चालतो दंगा**
**मनाविरुध्द घडता थोडे**
**मनमोकळा वाजतो भोंगा ..**

.. थोडक्यात डॉ.सुरेश सावंत लिखित ' एलियन आला स्वप्नात ' या कवितासंग्रहातील बालकविता मुलांच्या परिचित असलेल्या साध्या-सोप्या शब्दांत आविष्कृत झाली असून विविध प्राणिमात्रांची रंजक नि गमतीदार माहिती इथे प्रस्तूत झाली आहे आणि विशेष वाखाणण्यायोग्य बाब म्हणजे प्राणिमात्राविषयींची ही सारी अनोखी माहिती कवी डॉ.सुरेश सावंत यांनी कवितेच्या रुपात स्वतःच्या प्रातिभिक कौशल्याने अगदी सहजसुंदरतेने गुंफली असल्यामुळे ही कविता मनोरंजक नि वाचनीय तर झालीच आहे ; पण सोबतच ती मुलांच्या माहितीत भर टाकून त्यांच्या जाणिवाही विकसित करणारी आहे.तसेच उत्तम दर्जाची पुस्तकाची निर्मिती, पुंडलिक वझे यांचे मुखपृष्ठ नि आतील रंगीत रेखाचित्रे आणि आर्टपेपरवरील छपाईमुळे हा संग्रह देखणा झाला आहे.या सर्व विशेषांमुळे हा बालकवितासंग्रह बालकुमारांच्या पसंतीस नक्कीच उतरेल,असा सार्थ विश्वास वाटतो.

**( बालकविता ) - एलियन आला स्वप्नात**
**कवी - डॉ.सुरेश सावंत**
**प्रकाशक - चेतक बुक्स,पुणे**
**पृष्ठे - ५६**
**मूल्य - ३६०**
**मुखपृष्ठ - पुंडलिक वझे**



# नऊ रंगांची उधळण: नऊ रंगी साड्यांचा साज सुरू!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**आपल्या भारत देशात अनेक सण साजरे केले जातात, त्यापैकीच एक सण म्हणजे नवरात्र होय. हा सण भारतातील विविध भागात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. अश्विन महिन्याच्या पहिल्याच दिवशी नवरात्र उत्सवाला सुरुवात होते. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी सार्वजनिक मंडळामध्ये देवीच्या मूर्तीची स्थापना करतात. हिंदू धर्मग्रंथांमध्ये नवरात्रीच्या सुरुवातीला विशिष्ट वेळेत घटस्थापना विधी करण्यासाठी चांगले नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे आहेत.**

घटस्थापनेमध्ये देवीची पूजा समाविष्ट आहे, जे योग्य वेळी केली पाहिजे. शास्त्रांनी चेतावणी दिली आहे, की जर हा विधी चुकीच्या वेळी केला गेला तर यामुळे देवीला क्रोध येऊ शकतो. घटस्थापना करण्यासाठी अमावस्या आणि रात्रीची वेळ टाळावी. प्रतिपदा चालू असताना दिवसाचा पहिला एक तृतीयांश घटस्थापना करण्याचा सर्वात शुभ काळ आहे. जर कोणत्याही कारणामुळे ही वेळ उपलब्ध नसेल, तर ती अभिजित मुहूर्ताच्या वेळी करता येते. घटस्थापनेदरम्यान नक्षत्र चित्र आणि वैधृती योग टाळावेत, जरी ते प्रतिबंधित नसले तरी. प्रतिपदा चालू असताना हिंदू मध्यान्ह आधी घटस्थापना करणे सर्वात महत्वाचे आहे, असे शास्त्रात सांगितले आहे.

यावर्षी दि.१५ ऑक्टोबर २०२३पासून शरद नवरात्री सुरू होईल. शरद नवरात्री सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात साजरी केली जाते. दुर्गादेवीची पूजा करणे हे भक्तांचे मुख्य कार्य आहे. नवरात्री म्हणजे देवी शारदा, दुर्गा पूजेचा पवित्र सण आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते. घटस्थापना हा नवरात्रीचा पहिला दिवस म्हणजेच नवरात्रीच्या नऊ दिवसांच्या उत्सवाचा आरंभ आहे. घटस्थापना हा नवरात्रीच्या दरम्यान केला जाणारा एक अत्यंत महत्वाचा विधी आहे. कलश स्थापना हे घटस्थापनेचे दुसरे नाव आहे. दुपारी, सूर्योदयानंतर आणि रात्रीची वेळ म्हाणजेच सोळा घाटीच्या पलीकडे कोणत्याही वेळी घटस्थापनेसाठी मनाई आहे. नवरात्री हा हिंदू सण आहे आणि लोक हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करतात. शक्तीची देवी म्हणजेच दुर्गा देवी यांच्या स्मरणार्थ नवरात्री हा एक भव्य उत्सव आहे. या सणामध्ये देवी दुर्गाची नऊ दिवस वेगवेगळ्या भूमिकेत पूजा केली जाते. देवी दुर्गा नवरात्रीच्या दरम्यान नऊ वेगवेगळ्या रूपात पृथ्वीवर आशीर्वाद देते. देवीचा आशीर्वाद आपल्याला नवरात्रीला दुर्गा, लक्ष्मी आणि सरस्वतीच्या रूपात दिला जातो. नवरात्रीचा पहिला दिवस घटस्थापना केली जाते.

नवरात्रीचा शाब्दिक अर्थ आहे, नऊ धार्मिक रात्रींचा उत्सव किंवा सण होय. या नऊ दिवसांमध्ये देवी दुर्गास तिच्या तीन सर्वोच्च रूपांमध्ये पूजल्या जातात. शारदीय नवरात्रीच्या पहिल्या दिवशी कलश स्थापनेने देवी दुर्गाची पूजा सुरू होते.



घटस्थापना पूजेसाठी आवश्यक गोष्टी अशा- सप्त धान्य पेरण्यासाठी मातीचे भांडे-कलश, सप्त धान्य पेरणीसाठी स्वच्छ आणि चांगली माती, सप्त धान्य किंवा सात वेगवेगळ्या धान्यांचे बियाणे, पाणी, सुगंधी अत्तर, पवित्र धागा- माऊली, सुपारी, नाणी, विड्याची पाने, आंब्याची पाने, तांदूळ- अक्षता, नारळ, दोन लाल कापड, फुलांच्या माळा दोन किंवा फुले, दुर्वा- गवत, देवी दुर्गाचे चित्र- मूर्ती, धूप, दिवा, तूप, कापसाची वात, फळे, मिठाई, पूजा थाळी- आरती, हळद, कुंकू, गुलाल, बुक्का, देवीसाठी चुनरी आदी. याशिवाय दोन नारळ एक कळसावर ठेवण्यासाठी आणि एक देवीची ओटी भरण्यासाठी ओटी भरण्यासाठी थोडेसे गहू, सतीच वान, आरतीसाठी निरंजन, निरंजनामध्ये तूप आणि वाती, समोर लावण्यासाठी समई व समईमध्ये तेल आणि वाती याशिवाय खडीसाखरेचा प्रसाद आणि घटाला बांधण्यासाठी झेंडूच्या पानाची माळ आणि घटाच्या भोवती काढण्यासाठी रांगोळी हे सर्व साहित्ये घट सजविताना आवश्यक आहेत. कलश असे भरतात- खुल्या तोंडाचे मातीचे भांडे घेऊन भांड्याच्या अर्ध्या भागापर्यंत माती भरतात. नंतर धान्याच्या बिया घालतात. बियांच्या वर माती घालतात. पुन्हा धान्याच्या बिया घातल्या जातात. मग मातीचा तिसरा आणि शेवटचा थर भांड्यात पसरवला जातो. आवश्यक असल्यास माती सेट करण्यासाठी भांड्यात थोडे पाणी घातले जाते. यानंतर कलशावर पवित्र धागा बांधतात. कलश- भांडे मानेपर्यंत पाण्याने भरावे लागते. कलशमध्ये सुपारी, दुर्वा गवत, सुगंधी अत्तर घातले जाते. कलशमध्ये काही नाणी ठेवावी लागतात. कलशच्या काठावर झाकणाने झाकण्यापूर्वी पाच आंब्याची पाने ठेवली जातात. मग कलशमध्ये अक्षता ठेवाव्या लागतात. एवढे झाल्यावर नारळ घेऊन ते लाल कपड्यात गुंडाळतात. पवित्र धाग्याने नारळ आणि लाल कापड बांधले जाते आणि ते कलशच्या वर ठेवले जाते. शेवटी कलश हा तयार केलेल्या धान्याच्या भांड्यावर मध्यभागी ठेवला जातो. त्यानंतर पुष्पहार, दिवा, धूप काठी, फळे, गोड आणि सुगंध ठेवून पूजा थाळी तयार करतात.

कलश आणि धान्याच्या भांड्याला पहिली प्रार्थना करून देवी दुर्गाचे आवाहन केले जाते आणि तिला विनंती करतात, की आपली प्रार्थना स्वीकारावी आणि नऊ दिवस कलशमध्ये राहून आम्हाला आशीर्वाद द्यावे. नावाप्रमाणे पंचोपचार पूजा पाच पूजा वस्तूंसह केली जाते. दिवा लावून कलशाभोवती प्रदक्षिणा घातली जाते. धूप लावून कलशाभोवती गोल फिरतात. कलशवर फुलांची माला ठेवून फुले अर्पण केली जातात. शेवटी पंचोपचार पूजेची सांगता करण्यासाठी नैवेद्य म्हणजेच कलशला फळ आणि गोड पदार्थ अर्पण करतात. कलशवर अत्तर शिंपडून देवतेला सुगंध अर्पण केले जाते. एका पाटावर किंवा खाली लाल कापड ठेवून दुर्गा देवीचा फोटो किंवा मूर्तीवर चुनरी ठेवतात. देवी दुर्गाला प्रार्थना करतात. तिला नऊ दिवस त्या जागी राहायला विनंती केली जाते. देवी दुर्गाच्या फोटो किंवा मूर्तीभोवती दिवा आणि धूप फिरवतात. दुर्गा देवीला पुष्पहार घातला जातो. दुर्गा देवीला गोड आणि फळ अर्पण करतात. कलश आणि दुर्मिळ भांडे देवी दुर्गाजवळ ठेवले जाते. प्रार्थना करत दररोज नऊ दिवस फक्त भांड्यावर पाणी शिंपडून नऊही दिवस पूजा करतात. कोणी देव-देवींच्या कथा वाचतात आणि सकाळी व संध्याकाळी प्रार्थना करतात. शक्य असल्यास ताजी फळे आणि गोड पदार्थही नऊ दिवस अर्पण करतात.

नवरात्रीतील नऊ दिवस सर्वजण मोठ्या श्रद्धेने देवीची पूजा करतात. सार्वजनिक मंडळाच्या ठिकाणी भजन, कीर्तन तसेच अनेक देखाव्यांचे आयोजन केले जाते. ते बघायला लोक एकत्रित येतात. बरेच लोक नऊ दिवस उपवास करून देवीचे व्रत पूर्ण करतात. नवरात्रीचे नऊ दिवस देवीला वेगवेगळ्या रंगांच्या साड्या नेसवल्या जातात. देवीप्रमाणे सर्व स्त्रियाही नऊ दिवस वेगवेगळ्या रंगाच्या साड्या नेसतात. नवरात्रीमध्ये सर्वत्र सजावट पाहायला मिळते. नाना दृश्यांसह मोठे-मोठे मंडप बघायला मिळतात. विविध सार्वजनिक मंडळातर्फे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. स्त्रिया, पुरुष तसेच लहान मुलं दांडिया, गरबा खेळतात. विविध स्पर्धांमध्ये सहभागी होतात. या नऊही दिवशी सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते. कलकत्ता, गुजरात, बिहार, आसाम यांमध्ये या सणाला वेगळेच महत्व आहे. तेथे मोठ्या प्रमाणात दुर्गापूजाचे आयोजन केले जाते. देवीने राक्षस महिषासुराचा वध केला म्हणून देवीला महिषासुरमर्दिनी असे सुद्धा म्हटले जाते. दहाव्या दिवशी देवीच्या मूर्तीचे विसर्जन केले जाते या दिवसाला दसरा असेही म्हणतात. हा सण एकमेकांना जवळ आणतो. वाईट गोष्टीवर मात करून नवीन गोष्टी आत्मसात करण्याचा हा सण आहे. खरे तर स्त्रीचा सदैव सन्मान करणे व राखणे याहून पुण्यप्रतापी नवरात्रोत्सवाची दुसरी घटस्थापनाच नाही; हे विसरून कसे चालेल? !! आदिमाया आदिशक्तीच्या घटस्थापना निमित्ताने समस्त भक्तांना शारदोत्सवाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# सामान्य माणसानं-तरुणानं पुढं यावं अन्यथा गुलामी अटळ

आधुनिक केसरी

**मागील दोन महिन्यांपासून राज्यात आरक्षणावरून वादंग निर्माण झालेले आहे.मराठा समाज असो वा धनगर, मोर्चे धरणे उपोषणाने राज्याचे वातावरण ढवळून निघाले आहे.मनोज जरांगे पाटला सारखा तारणहार भेटल्या मुळे आर्थिक दृष्ट्या मागास असलेला मराठा समाज घराबाहेर पडताना दिसत आहे. राज्यात एकंदरीत असी परिस्थिती असताना राज्य सरकारने दोन महत्त्वाचे निर्णय घेतले,एक म्हणजे नऊ खाजगी कंत्राटदार संस्था च्या माध्यमातून जवळपास १३८ प्रकारची शासकीय पदे कंत्राटी पद्धतीने भरली जातील आणि दुसरा म्हणजे राज्यातील ६२ हजार शासकीय शाळां पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्यांना दत्तक देण्यात येतील. राज्यातील बहुतांश जनता आरक्षण मागण्यात गुंतलेली पाहून सरकारनं मोठा डाव टाकला आहे.**

राज्यातील ६२ हजार शासकीय शाळां दत्तक देण्याची योजना आणत राज्य सरकारने या शाळांच्या खाजगीकरणाचे षडयंत्र रचले आहे. पायाभूत सुविधा च्या नावाखाली या शाळा व या शाळांचे भूखंड धनदांडग्यांच्या घशात घातली जातील, प्रत्येक गाव-शहरातील शासकीय शाळा अतिशय महत्त्वाच्या ठिकाणी आहेत, सदरील शाळांच्या भुखंडाच्या किमती पाहिल्या तर या योजने मागील अर्थकारण लक्षात येईल.मुळात सहा ते चौदा वयोगटातील मुलांना सक्तीचे आणि दर्जेदार शिक्षण व शैक्षणिक वातावरण निर्माण करणे ही केंद्र व राज्य सरकारची घटनात्मक जबाबदारी असताना या असल्या योजना राबवून सरकार शैक्षणिक जबाबदारी मधून अंग काढून घेत आहे.

शिक्षकांच्या जागा भरल्या जात नाहीत, दर्जेदार शैक्षणिक वातावरण निर्माण होईल यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात प्रत्येक सरकारनं टाळाटाळ केल्याचे दिसून येते, यामुळे शासकीय शाळांची पटसंख्या रोडावली, भरमसाठ इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मान्यता दिली गेली आणि शहरासह खेड्यातील पालक सुध्दा इंग्रजी माध्यमाच्या शाळा कडे वळला गेला,आपला पाल्य सुटाबुटात जातोय म्हणून पालक खूश झाला पण या शाळांची फी व त्या तुलनेत मिळणारी गुणवत्ता अभ्यासण्याची गरज आहे. सरकारने शासकीय शाळां कडे दुर्लक्ष करून जाणीवपूर्वक वरील परिस्थिती निर्माण केली आहे.आणी आता तर शासकीय शिक्षण व्यवस्था मुळासकट उपटून टाकायला निघाले आहेत.

ज्या फुले शाहू आंबेडकरांनी सर्वसामान्यांना



शिक्षणाची संधी निर्माण करुन दिली ती संधी हिरावण्याचे काम सरकारी झारीतले शुक्राचार्य करत आहेत. शासकीय शाळा धनदांडग्यांच्या घशात गेल्या तर भविष्यात शिक्षण ही फार महागडी बाब ठरणार असून ती शेतकरी कष्टकरी कामगार यांच्या आवाक्याबाहेर असेल आणि पर्यायाने पुन्हा निरक्षर पिढ्या जन्माला येतील, समाजाचे सदरील घटक पुन्हा पंधराव्या सोळाव्या शतकात लोटले जातील. काही दिवसांपूर्वी नाशिक मधील एका शाळेत तमाशा सदृश कार्यक्रम आयोजित करण्यात आला, सदरील शाळा एका मद्यनिर्मिती करणाऱ्या कंपनीने दत्तक घेतल्याचे पुढे आले,शिता वरुन भाताची परीक्षा ही असी असणार आहे.

विरोधी पक्ष स्वतः चे घर सांभाळण्यात व्यस्त आहेत, शासकीय शाळांचे बहुतांश पालक या बाबी पासून अनभिज्ञ आहेत, काही शिक्षक संघटना मोर्चे काढत आहेत पण त्यांचा पाहिजे एवढा परिणाम जाणवत नाही कारण काही शिक्षक संघटना मुळातच राज्यकर्त्यांशी बांधील आहोत.

हे जर थांबवायचे असेल तर सर्व सामान्यांना पुढं येऊन विरोध करावा लागेल, तळमळ असणाऱ्या शिक्षकांनी पालकांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे, गावागावांतून उठाव झाला तर सरकार ला माघार घेतल्या शिवाय पर्याय नाही. नगर जिल्हा शेवगाव तालुक्यातील हातगाव ग्रामस्थांनी याबाबत पुढाकार घेतल्याचे दिसून येते, येत्या पंचवीस तारखेपासून ग्रामस्थांनी उपोषणाचा इशारा दिला आहे, बाकीच्या गावात सुध्दा असे उपोषण -धरणे व्हावेत.

शासकीय नौकरी चे कंत्राटीकरण हे सरळसरळ मुठभर लोकांना कोट्यावधी रुपयांची खिरापत वाटणारी योजना असून गोरगरिबांच्या मुलांचे आर्थिक शोषण करणारी आहे.ऊदाहरण दाखल ग्रामपंचायत कार्यालयातील संगणक परिचालक घेऊ यांच्या साठी सरकारकडून मासिक बारा हजार रूपयांचे मानधन दिले जाते, प्रत्यक्षात मात्र यांना सहा ते सात हजारच पदरात पडतात, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या रुग्णालयातील रुग्णवाहिका चालकांची हीच परिस्थिती, कष्ट करणाऱ्यांची अशा प्रकारची आर्थिक पिळवणूक ही वेठबिगारी नाही तर आणखी काय आहे?

आता तर १३८ प्रकारची पदे अशा प्रकारे भरायची आहेत,किती मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण होणार आहे, आणि मुठभर लोक काहीही न करता सरकारी आशिर्वादाने कोट्याधीश होणार आहेत.

राजकीय पक्ष तथा त्यांचे नेते आपापली घरे सांभाळण्यात व्यस्त आहेत, सामान्य माणसानं तरुणांनी पुढे यावे अन्यथा गुलामी अटळ.

नीलेश बाबासाहेब ढाकणे
जि. अहमदनगर, 8208121771

# लई नाही मागणे..



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**काही निवडणुका जाहीर झाल्या आहेत. आणखीन काही जाहीर होतील टप्प्याटप्प्याने.. विधानसभा, लोकसभा.. दर पाचवर्षांनी तेच लोकशाहीचे नाटक.. तेच ते नाटक पाहण्याचा कंटाळा आलाय आता लोकांना. कारण मागील अंका वरून पुढे चालू असेच असते हे नाटक! लोकशाहीच्या या प्रक्रियेत लोक महत्वाचे असतात. लोक म्हणजे तुम्ही आम्ही. सामान्य जनता, मतदाता. पण त्याला काही महत्त्वच राहिले नाही. त्याची किंमत फक्त मतदान करण्यापुरती.. पुढारी नेते याच्यासाठी तो एक अंक..मतगणनेतला नंबर.. तुम्हाला फक्त कुणाला किती कोणी मतदान केले या संख्येत इंटरेस्ट.. या मतदाराला काय हवे, त्याच्या आवश्यक गरजा कोणत्या याच्याशी पुढाऱ्याला, पक्षाला काही देणे घेणे नाही. ते आपल्या मर्जीने अजेंडा ठरविणार.. घोषणा ठरविणार. जाहीरनामा तयार करणार. त्यासाठी पक्षाचे सेल्स आहेत. पगारी तज्ञ आहेत. तुमच्या गरजा, भविष्याच्या एकूण राज्याच्या, देशाच्या गरजा याशी त्याचे सोयरेसुतक नाही. पण हे असे पुढे चालणार नाही.**

तुम्हाला आमच्याशी आधी संवाद साधावा लागेल. आम्हाला काय हवे ते जाणून समजून घ्यावे लागेल. समजून घ्यावे लागेल ते यासाठी की आतापर्यंत तुम्ही जनतेला समजून घेतलेच नाही. त्याच्या प्रश्नाची तुम्हाला जाण नाही. तेव्हढा तुमचा अभ्यास नाही. तेवढी शैक्षणिक पातळी नाही. बुध्दी, प्रज्ञा, प्रतिभा राहिली दूरच. हे उदाहरणाने स्पष्ट होईल. तुम्ही गरिबी हटाव चा नारा दिला. ७५ वर्षे झाली. गेली का गरिबी? कारण तुम्ही गरिबी म्हणजे काय, तिची व्याख्या काय हेच ठरविले नाही. सारी राज्ये, केंद्र सरकारने शेतकऱ्याचा प्रश्न सोडविण्याचा विडाच उचलला. किती सवलती दिल्या. ब्यांकेत पैसे जमा केलेत. वीजमाफ, पाणीमाफ.. सगळेमाफ. .फुकट.. कोट्यावधीचे बजेट.. सुटले का बळीराजाचे प्रश्न? थांबल्या का आत्महत्या. किती जाती, वर्ग, सवलती घेतात.. वर्षानुवर्षे.. मग अजूनही बहुसंख्य लोक मागासलेले हे कसे? मुख्यप्रवाहात त्यातले कुणीच कसे येत नाही अजून? त्याच्या मागण्यासाठी का निघतात लाखोंचे मोर्चे, का होतात आमरण उपोषण? का जातात वंचितांचे जीव? याचा अर्थ तुम्ही म्हणायला सरकारी तिजोरी रिकामी करता दरवर्षी. पण दलीत वंचितांचे,गोरगरीब शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत तेच आहेत.. कुठे गेली तुम्ही निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने? कुठे गेले तुमचे पक्षाचे जाहीरनामे? खरे तर पक्ष या शब्दाला देखील अर्थ नाही राहिला आता.कोण कोणत्या पक्षात हेच कळत नाही. तुम्हालाही माहिती नसणार तुमचा पक्ष कोणता.. आजचा.. उद्याचा? आम्हा सामान्य जनतेच्या,



आर के लक्ष्मण यांच्या कॉमनमॅन च्या अपेक्षा फार नाहीत खरे तर. अगदी साधे सोपे आहे सगळे तुम्ही समजून घेतले तर! आम्हाला भ्रष्टाचार मुक्त सरकार, स्वच्छ नेते हवेत.. देशाची अर्धी अधिकसंपत्ती भ्रष्टपुढारी, अधिकारी वाटून घेतात. व्हायचे ते काम होतच नाही नीट नेटके. सरकारी तिजोरीला लागलेली ही वाळवी आधी नष्ट करा. लोकप्रतिनिधी, मंत्री कसे घटकेत गर्भश्रीमंत होतात, अन्गरीब गरीबच का राहतात याचा शोध घ्या. बांधकाम व्यवसाय, बॉलिवूडचा धंदा, वाळू, खनिज, ड्रगमाफिया याच्यावर कारवाई करा. ते सरकारला, सामान्य जनतेला किती लुटतात याचा नीट तपास करा. हे वाहत वाया जाणारे घाण पाणीबंद केले तर अर्ध्या अधिक समस्या सुटतील. तरुणांना सवलती नको,नोकऱ्या द्या. त्याच्या हाताला, बुध्दीला काम द्या. ते रिकामे आहेत म्हणून रस्त्यावर येताहेत. मोर्चे काढताहेत. त्यांना काम मिळाले, त्यातून आनंद मिळाला, त्याचे कुटुंब स्वावलंबी झाले तर ते अनुदान, सवलती काहीच मागणार नाहीत. तुम्ही सरकारमध्ये असून काही करत नाही,त्यांना हवे ते काम देत नाही, फक्त टाईमपास करता, म्हणून हे सगळे प्रश्न, समस्या निर्माण होतात.

उत्तम शाळा, प्रतिभावान प्रामाणिक शिक्षक, भविष्याचा वेध घेणारे तांत्रिक, व्यावसायिक, नैतिक शिक्षण ही देशाची प्राथमिक गरज आहे. गावातील शालाची अवस्था बघा. शालेय नव्हे उच्चशिक्षणाची तीच दीन अवस्था आहे. योग्य प्राध्यापक नाहीत, प्रयोगशाळा, सुविधा नाहीत अशी परिस्थिती आहे. आयआयटी सारख्या संस्थेत एका वर्गात २५०-३०० मुलं, याला काय म्हणावे? किती तरुण विद्यार्थी सारख्या आत्महत्या करताहेत! घेतले कधी याचा शोध. काही उच्चशिक्षणसंस्थेतील किती तरी मुलं मानसिक आजाराने तणावग्रस्त आहेत. त्याचे पालक, शिक्षक सारेच हतबल झाले आहेत. कुणी निर्माण केली ही परिस्थिती? कोण जबाबदार आहे या सर्वासाठी? आहे ऊतर तुमच्या पक्षाच्या जाहीरनाम्यात? या प्रश्नाचा वेध घ्या.

सरकारी दवाखान्यातील आरोग्याची काय स्थिती आहे? आजकाल बातम्या वाचूनच धडकी भरते ! कुठे आहेत इथले डॉकटर? किती आहेत डॉकटर, नर्सेस, वार्ड, खाटा? काय सोय आहे इमर्जन्सीसाठी? अवघड शास्त्रक्रियेसाठी? योग्य त्या सर्व मेडीसिंसचा,उपकरणाचा साठा उपलब्ध आहे सर्व सरकारी दवाखान्यात? तुमचेच पुढारी, मंत्री सरकारी दवाखान्यात जात नाहीत कधीच उपचाराला.. त्यांना फाईवस्टार मल्टी स्पेशालिटीहॉस्पिटल लागतात उपचाराला, तपासणीला. त्यांची सरकारी अधिकाऱ्या ची मुलं कुठे जातात सरकारी शाळेत? आधी हे कम्पल्सरी करा. मंत्री, सरकारी अधिकारी यांनी सरकारी दवाखान्यातच उपचार घ्यायचे. सरकारी शाळेतच आपल्या मुलांना घालायचे. म्हणजे कदाचित या संस्था सुधारतील! कायद्याचा धाक हवा प्रत्येकाला.कायदा सामान हवा प्रत्येकासाठी. कितीतरी नेते चक्क गुन्हेगार पार्श्वभूमीचे आहेत. त्याच्यावर खटले चालू आहेत. यांना एकदम बाद करा व्यवस्थेतून. त्याच्या ऐवजी स्वच्छ चारित्र्याची, सुशिक्षित, प्रामाणिक नवी तरुण प्रतिभावान माणसे निवडा.. त्यांना लोकप्रतिनिधी म्हणून संधी द्या. बदल घडेल. तीच ती खाऊगल्लीतली माणसे किती सहन करायची आम्ही. आम्हालाही कंटाळा आला तेच ते चेहरे पाहून.तीच ती रटाळ भाषणे ऐकून! नव्या उत्साही तरुण मुलामुलींच्या हाती देश द्या, सरकार द्या. मग बघा कसा बदल,चमत्कार घडतो ते! कायद्या पुढे सारे समान हवेत. गुन्हेगार मंडळी सरकारी दरबारी पाहुणचार घेताहेत, पदे भूषविताहेत हे आता चालणार नाही. आम्हाला मुळीच मान्य नाही. सरकारी नोकरीसाठी तुम्ही चारित्र्याचे सर्टिफिकेट मागता. दोनतीन तज्ञांचे मत,शिफारस मागवता. मग सरकार चालवणाऱ्यासाठी तोच नियम का नको? तुरुंगात गेलेल्या व्यक्तीची कुलगुरू म्हणून नियुक्ती होईल? शास्त्रज्ञ, अधिकारी म्हणून विचार होईल? मग हाच नियम सरकार चालवणाऱ्यासाठी का नको? आम्हाला स्वच्छ चारित्र्याची, प्रामाणिक, मेहनती, सुशिक्षित पुढारी हवे आहेत हा देश चालवायला. तुम्ही कुणालाही उभे करायचे अन्आम्ही मजबुरी म्हणून निवडून द्यायचे हे चालणार नाही आता..

बस फार नाही.. एव्हढे साधे मागणे आहे सामान्य जनतेचे.. उमेदवार निवडण्यापूर्वी, पक्षाचा जाहीरनामा तयार करण्यापूर्वी हा विचार नक्की करा.. नाही तर नोटाचा पर्याय तुम्हीच दिले कायद्याने.. ती परिस्थिती येऊ देऊ नका प्लीज!

# विचारांचे संस्कार हे साहित्यातून मिळतात



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**सुसंस्कृत आणि आदर्श जीवन हि प्रत्येकाची अपेक्षा असते .पण हिच अपेक्षा पूर्ण होण्यासाठी आपले आचार विचार योग्य उत्तम आणि दर्जेदार असले पाहिजेत. दैनंदिन जीवनात आहाराचं महत्व जितकं आहे तितकंच महत्त्व जीवन हितार्थ विचारांचं आहे. त्यामुळे पोटात अन्न आणि डोक्यात विचार योग्यच टाकले पाहिजे. जीवन म्हटलं कि आयुष्भर शिकावं लागतं वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या प्रकारचे जीवन हितकारक संस्कार आपल्याला मिळत असतात . त्यापैकी विचारांचे संस्कार आपल्याला वेगवेगळ्या साहित्यातुन मिळत असतात. सुसंकृत विचारांचे संस्कार हे साहित्याच्या अनमोल खानीतुन मिळत असतात.सकारात्मक विचारांमुळे एक वेगळी उर्जा निर्माण होत असते . तसेच आदर्श आणि लोक कल्याणकारी जीवन जगण्याची प्रेरणा देखिल मिळात असते.**

असे प्रभावी उत्कृष्ट आणि दर्जेदार विचारांचे संस्कार हे आपल्याला साहित्यातून मिळत असतात. तसेच जीवन जगत असताना आपले आचार, विचार, वर्तणुक, गुण ,दोष, चांगले, वाईट विचार, त्याच बरोबर आपली सामाजिक प्रतिम, प्रतिष्ठा, ह्या सगळ्या महत्त्वाच्या बाबी ह्या आपल्यावर झालेल्या वेगवेगळ्या संस्कारांवरच अवलंबून असतात. तसेच आपलं जीवन सार्थकी लागलं .अथवा निरर्थक झाल. हे फक्त आपल्या वर झालेल्या चांगल्या, वाईट ,योग्य,अयोग्य संस्काराचे प्रतिबिंब स्वरूप असते . आपण जीवन जगत असताना जीवना मध्ये जीवनाच्या वेग वेगळे टप्पावर जसं बालपणी आई , प्राथमिक शिक्षण घेताना शिक्षक दहावीच्या दरम्यान मित्र आणि दहावी नंतर समाज वातावरण आणि या सगळ्या बरोबरच या दरम्यान आपण वाचन करत असलेलं साहित्य खुप महत्वपूर्ण आहे .कारण या वेगवेगळ्या टप्प्यांवर



आपल्यावर वेग वेगळ्या प्रकारचे संस्कार होत असतात .आपले आई-वडील,शिक्षक, मित्र, आणि आजुबाजुला असणारे वातावरण यानुसार आपण घडत असतो.तसेच याच दरम्यान च्या काळात काही संस्कार आपल्यावर होत असतात .तसेच सगळ्यात महत्वाचे आणि प्रभावी संस्कार ज्याला आपण विचारांचे संस्कार म्हणतो.हे विचारांचे संस्कार आपल्या जीवनात खूप महत्वपूर्ण भुमिका निभावत असतात ते संस्कार आपल्याला उत्कृष्ट आणि दर्जेदार साहित्यातून मिळत असतात . त्याचे परिणाम स्वरूप आपल्या जीवनावर सकारात्मक होत असतात आणि त्या संस्कारातून आपण घडत असतो या सगळ्या संस्कारांमध्ये विचारांचे संस्कार हे जीवनात सकारात्मक उर्जा निर्माण करतात आणि आपल्या आदर्श जीवन जगण्याची प्रेरणा देत असतात म्हणून हे विचारांचे संस्कार खूप महत्वपूर्ण आहेत .म्हणून आपल्या जीवनामध्ये दैनंदिन आणि नियमित दर्जेदार साहित्य आपण वाचन केलं पाहिजे .अनादी काळापासून ते आज तागायत पर्यंत म्हणजे सत्ययुग, त्रेतायुग , द्वापारयुग,आणि कलयुग , या चारही युगात मानवी जीवनातील विचारांच्या संस्काराचे साहित्य हे उगमस्थान राहिलेल् आहे. आणि सध्याच्या गतिमान, आधुनिक तसेच तंत्रज्ञान आणि विज्ञान युगातील कालखंडात सुद्धा साहित्य हे मानवी जीवनातील मूलभूत आणि पायाभूत संस्काराचे प्रेरणास्थान आहे . साहित्य ही कलाकृती कल्पनाप्रधान असली तरी साहित्याची पाळेमुळे वास्तवाच्या जमिनीवर खोलवर रुजलेली असतात. वास्तवातील घटना प्रसंग याची निवड करून त्याची पुनर्रचना करून आणि त्यामध्ये स्वतःची नवी भर घालून साहित्यिकाने साधलेली वास्तव संमातर अशी ती नवनिर्मिती असते .आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे साहित्य हे लोक हितार्थ असते . म्हणजे साहित्याची रचना समाजाचं हित साध्य होण्यासाठीच केलेली असते. तसेच ज्या विचारातून समाज हित साध्य होऊ शकत नाही ते विचार साहित्य स्वरुप नसतात. किंवा साहित्याचा भाग होऊ शकत नाही . साहित्यातून मिळणारे विचारांचे संस्कार आपल्याला आदर्श जीवन जगण्याची आणि यशस्वी होण्याची प्रेरणा देतात. तसेच साहित्यातून मिळणारे संस्कार आपल्याला माणूस म्हणून जगण्याची देखिल प्रेरणा देतात ज्या पद्धतीच्या साहित्याच आपण अनुकरण करतो वाचन करतो किंवा ऐकतो त्या पद्धतीने आपलं जीवन घडत असतं आपण अवलोकन केलेल्या साहित्य विचारांचे संस्कार हे परिणाम स्वरूप चांगले-वाईट आपल्या जीवनामध्ये दिसत असतात. म्हणून आदर्श आणि उत्कृष्ट दर्जाचे दर्जेदार साहित्य आपण नियमित दैनंदिन वाचन केले पाहिजे. ऐकले पाहिजे कारण जीवनातील अमुल्य महत्वपूर्ण असे विचारांचे संस्कार आपल्याला साहित्यातून मिळत असतात. आपल जीवन हितार्थ व कल्याणकारी व्हावं म्हणून दैनंदिन जीवनात एक विशिष्ट असा वेळ आपण आध्यत्मिक साहित्य वाचन नक्कीच केलं पाहिजे जेणेकरून आपले संस्कार आणि संस्कृती बळकट होण्या बरोबरच आदर्श जीवन पथ मार्ग देखिल यशस्वी होईल आणि आपोआप सुसंस्कृत विचारांचा प्रभाव निर्माण होऊन एक वेगळी उर्जा आपल्या जीवनात संचारेल या मध्ये शंका नाही.

# पाणी आणि वाणी जपून कधी वापरणार



उद्धवबापू फड
संपर्क क्र. : 9765588800

आधुनिक केसरी

**पाणी हे पृथ्वीचा आत्मा आहे. अनेक प्राचीन संस्कृती नदीकाठी विकसित झाल्या व पाण्याअभावी उध्वस्त झाल्या. पाणी रोजच्या जगण्याचाच नव्हे, तर आपल्या अस्तित्वाचा भाग आहे. ऋग्वेदात पाण्याचा उल्लेख जलदेवता असा केला आहे. आयुर्वेदात पाण्याचे महत्व सांगून त्याला नीर, जल, उदक, जीवन ही नावे दिली आहेत. याशिवाय सलील, आप, तोय, पय, अंभ, अर्ण वगैरे शब्दांचा वापर केवळ पर्यायी शब्द म्हणून केलेला नसून त्या त्या प्रकारच्या पाण्याच्या गुणधर्मानुसार वापरले जात असावेत. आप पुनातु पृथ्विम् । म्हणजे पृथ्वीला शुध्द करण्याची शक्ती पाण्यात असल्याचे सांगितले आहे. भारतीय संस्कृतीमध्ये पाण्याचे स्थान अनन्यसाधारण आहे. गंगा, यमुना, सरस्वती, सिंधू, कावेरी, नर्मदा, गोदावरी आणि कृष्णामाई या जीवनसरिता आजही भक्तिभावाने पुजल्या जातात. आपल्या पृथ्वीवर ९७ टक्के पाणी समुद्र रूपात आहे. ते खारे असल्याने मानवी उपयोगाचे नाही. तीन टक्के गोडे पाणी आहे.**

या पाण्याविषयी नाथ महाराज वर्णन करतात की.. नाथांच्या घरची उलटी खूण|* पाण्याला मोठी लागली तहान | आत घागर बाहेर पाणी| पाण्याला पाणी आले मिळोनी || आज मी ऐक नवल देखिले |वळचणीचे पाणी आढयाला लागले|| शेतकर्याने शेत पेरिले| राखणदाराला त्याने गिळिले | हंडी खादली भात टाकिला |बकऱ्यापुढे देव कापिला|| एका जनार्दनी मार्ग उलटा |जो जाणे तो गुरूचा बेटा || किंवा.. कभी प्यासे को पानी पिलाया नही बाद अमृत पिलाने से क्या फ़ायदा ...तर निळोबाराया... म्हणतात द्वारकेचि मूर्ती एकनाथा घरी । पाणी वाहे हरि कावडीने ॥१॥ नदीकाठाने मानवी जीवन संस्कृती अधिक संपन्न व समृद्ध होत गेली. पाण्याचे महत्त्व ओळखलेला जीवनाच्या प्राथमिक अवस्थेतील मानव पाण्याला पंचमहाभूतांपैकी एक मानून ‘जलदेवता’ संबोधून त्याची पूजा करत असे. पाण्याच्या पावित्र्याचे सामर्थ्य जिवापाड जपायचा. मात्र, माणूस जसा आधुनिक होत गेला, तशी त्याची पाण्याकडे पाहण्याची दृष्टी उपभोगाची, चैनीची होत गेली. पाण्याच्या बाबतीतील मानवाच्या या भांडवलदारी वृत्तीचे चित्रण काव्यात्मक भावनेत व्यक्त करताना कवी अरुण काळे आपल्या ‘वॉटर किंग्डम’ या कवितेत लिहितात- ‘मैदानी, तटवर्ती इतिहास परंपरेची धारा नदी, समुद्र, तलावाच्या सावलीत वाढलेली तुला हाताशी धरून माज कालवला माणसानं अन् तू केलंस सहकार्य मग झाली तुझी गटार आणि बाटली तुझी केली वस्तू आणि मोडली बाजारात... पाण्याच्या सोबतीने अनेक सामाजिक चळवळी उभ्या राहिल्या. मात्र, पाण्याने कधी भेदभाव केला नाही.

# सेंट्रल पार्क मेट्रो स्थानकाला मुर्बी गावाचे नाव देण्याची मागणी

## उद्‌घाटनापूर्वीच नामकरणाचा वाद पेटला

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** पुढील तीन - चार दिवसांतच नवी मुंबई मेट्रोचे उद्‌घाटन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होण्याची दाट शक्यता आहे.

परंतू उद्‌घाटनाच्या अगोदर "सेंट्रल पार्क" मेट्रो स्थानकाच्या नामकरणाचा वाद पेटला असून "सेंट्रल पार्क" मेट्रो स्थानकाला "मुर्बी" गावाचे नाव द्यावे अशी आग्रही मागणी मुर्बी ग्रामस्थांनी केली आहे.

त्यासाठी ग्रामस्थांच्या वतीने दि. १३ ऑक्टोबर रोजी सेंट्रल पार्क मेट्रो स्थानक येथे एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती मुर्बी गाव कमिटी अध्यक्ष जगदीश ठाकूर यांनी दिली.

तसेच सी.बी.डी. बेलापूर ते पेंधर हा ११ किमी मेट्रो मार्ग प्रवाशांच्या सेवेसाठी सज्ज झाला आहे.देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा पार पडणार आहे.त्यादृष्टीने सिडको व संबंधित यंत्रणा तयारीला लागल्या आहेत. या मेट्रो मार्गावरील सर्व स्थानके चकचकीत दिसत असल्याचे चित्र पाहायला मिळते.

नुकतेच मेट्रोचे काम सुरू झाले होते,२०१४ साली तत्कालीन ओवे ग्रुप ग्रामपंचायतीच्या दि. १५ ऑगस्ट रोजी झालेल्या ग्रामसभेत एक मताने ठराव मंजूर करण्यात आला. सदर ठरावाची प्रत सिडकोला देण्यात आली. या संदर्भात सिडको व संबंधित यंत्रणा यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. दि. १३ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या एक दिवसीय लाक्षणिक उपोषणाला सर्व ग्रामस्थांनी, राजकीय पक्षांनी उपस्थित राहून पाठिंबा द्यावा अशी मागणी मुर्बी गाव कमिटी अध्यक्ष जगदीश ठाकूर यांनी केली आहे.




**अस्मितेचा प्रश्न :** मेट्रो स्थानकाला मुर्बी गावाचे नाव देण्याची ग्रामस्थांची आग्रही मागणी मेट्रो प्रकल्पाचे काम सुरू होण्यापूर्वी पासूनच करण्यात येत आहे .

**अन्याय :** बेलापूर ते पेंधर मेट्रो मार्गावरील ११ पैकी ६ ठिकाणी स्थानिक गावांची नावे देण्यात आली असून मग मुर्बी गावावर अन्याय का ? असा प्रश्न मुर्बी गाव कमिटीचे अध्यक्ष जगदीश ठाकूर यांनी उपस्थित केला आहे .

**केराची टोपली :** सिडको व संबंधित प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे, परंतू या मागणीला सिडकोने केराची टोपली दाखविल्याने ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत .

**जाहीर पाठिंबा :** ९५ गाव , नैना व इतर प्रकल्पग्रस्त समिती अध्यक्ष विधिज्ञ सुरेश ठाकूर यांनी आंदोलनाला जाहीर पाठिंबा दर्शविला आहे .

# अंतरवाली सराटी येथे लाखोच्या संख्येने हजर राहा : जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** 14 तारखेला अंतरवाली सराटी येथे लाखोच्या संख्येने उपस्थित रहा, असे आवाहन जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव शरद जोशी संघटना महाराष्ट्र राज्य यांनी केले आहे.



मराठ्यांना आरक्षण मिळावे म्हणून हा लढा गेल्या 40 वर्षांपासून चालू आहे. यासाठी प्रथम बलिदान दिले ते आण्णासाहेब पाटील यांनी. यानंतर या आरक्षणासाठी अनेकांनी आपले बलिदान दिले. न भूतो न भविष्यती असे मोठ मोठे 58 मोर्चे काढले तरीपण आपणास अद्याप आरक्षण मिळाले नाही. प्रत्येक पक्षातील सत्ताधाऱ्यांनी आपल्याकडे सतत दुर्लक्ष केले. आपल्याच समाजाचे बहुसंख्य आमदार -खासदार असून देखील त्यांनी समाजाच्या प्रश्नांकडे सतत दुर्लक्ष केले, फक्त निवडणुकीत त्यांना समाज आठवतो. या प्रस्थापित मराठा नेत्यांनी गरीब मराठ्यांकडे कधीच लक्ष न दिल्यामुळे आज मराठा समाजाची स्थिती दयनीय झाली आहे.

पूर्वीसारखी शेती आता राहिली नाही. प्रत्येकाला एक दोन एकर जमीन राहिली, त्यातही अनेक जण भूमिहीन झाले आहेत. वेळेवर पाऊस पडत नाही, पडला तर बाजारभाव नाही. या कारणांमुळे शेती व्यवसाय तोट्यात आला आहे. शेतीवर जो खर्च केला तो पण वसुल होत नाही. उपजीविकेचे दुसरे साधन नाही,मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी पैसा नाही, जे शिकले त्यांना नोकरीं नाही. म्हणून समाजाला आरक्षण मिळण्याची अत्यंत गरज आहे.

अतिशय गरीब व सामान्य कुटुंबातीलमनोज जरांगे पाटील या प्रामाणिक कार्यकर्त्याने मराठा आरक्षण मिळावे म्हणून आता मोठा लढा उभारला आहे आजपर्यंत शंभर पेक्षा जास्त आंदोलन केले आहेत, 27 उपोषण केली आहेत. ते अतिशय सामान्य कुटुंबातील आहे. समाजास आरक्षण मिळावे म्हणून ते जीवाची पर्वा न करता लढत आहे. ते कोणाच्याही दबावाला व अमिषाला बळी न पडता लढा देत आहे.

शासनास आपल्या वेदना कळविण्यासाठी, आपली एकजूट दाखविण्यासाठी, जरांगे पाटील यांना भक्कम पाठिंबा देण्यासाठी, या निद्रिस्त शासनास जागे करण्यासाठी आपण लाखोंच्या संख्येने येत्या 14 तारखेला आंतरवाली सराटी येथे जायचे आहे. मराठा आरक्षणाचा हा लढा आता अंतिम टप्प्यात आला आहे. आपल्या भावी पिढीच्या भविष्यासाठी, आपले आरक्षणाचे ध्येय गाठण्यासाठी आता फक्त आपली एकजूट पाहिजे.

अशा प्रकारच्या कोणत्याही सबबी न सांगता प्रत्येक घरातून किमान एक तरी सदस्य आंदोलनासाठी निघाला पाहिजे. आता कंटाळा करायचं नाही. आता नाही तर कधीच नाही हे लक्षात ठेवा. आपली एकजूट व शक्ती दाखविण्याची हीच योग्य वेळ आहे म्हणून सर्वांनी या आंदोलनात सहभागी व्हावे.



# लोणार येथे राष्ट्रीय काँग्रेसची बूथ लेवल कमिटी गठीत

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** सर्व विधानसभांचा कार्यकाळ डिसेंबर 2023 ते जानेवारी 2024 दरम्यान संपणार आहे. त्यामुळे आता निवडणुका घेण्याची घोषणा निवडणूक आयोग करण्याची शक्यता आहे. अशातच आगामी नगरपालिका, विधानसभा/लोकसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे.

त्या अनुषंगाने महराष्ट्र प्रदेश कांग्रेस अध्यक्ष नाना पटोले यांच्या आदेशान्वये व ज़िल्हा अध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्या सूचनेनुसार लोणार शहरात प्रत्येक प्रभागामध्ये बूथ लेवल कमेटी गठीत करण्याचे सुचना प्राप्त होताच, लोणार येथील कॉंग्रेसचे सर्व पदाधिकारी जलद गतीने कामाला लागल्याचे चित्र आहे.

यातच प्रभाग क्र.१ च्या नगर सेविकापती तथा भारतीय राष्ट्रीय कांग्रेसचे अल्पसंख्यक तालुका अध्यक्ष तौफीक कुरेशी यांनी सर्व प्रथम प्रभाग क्र.१ मध्ये ४१ सदस्यी अर्थात सर्वात मोठी बूथ लेवल कमीटी गठीत करून लक्ष्मणदादा घूमरे यांच्या मार्फत लोणार शहर अध्यक्ष शेख समद शेख अहमद यांच्या सुपूर्द करुन पुढील हालचालींना वेग दिला आहे. नंदूभाऊ बोरे, प्रकाशभाऊ धुमाळ, इंदिरा गांधी ज्यु. कॉलेजचे अध्यक्ष शेख गफ्फार कुरेशी, सदस्य अब्दुल कादर कुरेशी, अण्णाभाऊ साठे फॉरमचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते साहेबराव पटोळे, हाजी अफसर खान, शेख अय्यूब खान साबुणकर, नगर सेवक सतीश राठोड, संतोष मापरी, माजी नगर सेवक शेख करामत, ओबीसी सेलचे अमदास इंगळे, दौलत मानकर,मतीन खान,आसिफ खान,रऊफ खान,अरबाज़ कुरेशी, साहिल खान, शेख सजाद, शेख जुनेद, NSUI विद्यार्थी कांग्रेसचे बुलढाणा ज़िल्हा उपाध्यक्ष मो.आकिब कुरेशी इत्यादींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आता इराणी, चायनीज लसूण बाजारात

## जळगाव मार्केटमध्ये देशी लसणाचे भाव पडले!

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव :** भारतीय लसणाला समाधाकारक भाव मिळत नसल्याचं चित्र नेहमीच पाहायला मिळतं. त्यातच भाव नसताना सरकारकडून इराणी लसणाची आयात सुरु करण्यात आलीये. त्यामुळे लसणाच्या दरामध्ये पुन्हा एकदा घट झाल्याचे चित्र आहे.

म्हणूनच सरकारच्या या आयात धोरणाचा शेतकऱ्यांकडून पुन्हा एक निषेध होत असल्याचे पाहायला मिळते. काहीच दिवसांपूर्वी टोमॅटो आणि कांद्याच्या दरमध्ये वाढ झाली होती. पण त्याची आयात करुन त्याचे दर घसरवल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात आला. दरम्यान हाच प्रकार सरकार लसणाच्या बाबतीत करत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सध्या बाजारापेठांमध्ये भारतीय लसणाला समाधानकारक भाव मिळेल अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती.

पण आता बाजारात इराणी आणि चायनावरुन लसूण बाजारपेठांमध्ये दाखल झाल्याने पुन्हा एकदा भारतीय लसणाला भाव मिळणार नसल्याचं शेतकऱ्यांनी म्हटले. तसेच इराणचा विदेशी लसूण जळगावच्या बाजारपेठांमध्ये दाखल झाल्याने स्थानिक दरात आणि विक्रीत घसरण झाल्याचं व्यापाऱ्यांचं म्हणणं आहे. जळगाव बाजार समितीमध्ये सध्या मध्यप्रदेश आणि राजस्थान येथील बाजार समितीकडून या इराणी लसणाची आवाक होत आहे. त्यामुळे हा लसूण खायला तितका चवदार नसतो. पण तरीही हा लसूण भारतीय लसणापेक्षा हा कांदा मोठा आणि सुंदर असतो. त्यामुळे त्याच्या मागणीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचं चित्र आहे. शिवाय याचे दरही भारतीय लसणाच्या दराइतकेच आहेत. त्यामुळे ग्राहक त्याला पसंती देत असल्याचा व्यापारी सांगत आहेत. सरकारकडून हे शेतकरी विरोधी असल्याचा आरोप करत कोणत्याही शेतमालाचा भाव वाढला की सरकार तो पाडण्यासाठी विदेशी माल आयात करते. तसेच निर्यात शुल्क देखील वाढवते, असा आरोप शेतकरी संघटनेचे नेते एस.बी. नाना पाटील यांनी केलाय. तर आता आपल्या शत्रू राष्ट्राकडून लसणाची आयात करुन त्याचे दर पाडले जात असल्याचा आरोप शेतकरी सध्या करत आहेत. आधीच शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाला त्याचा उत्पादन खर्चही निघत नाही. त्यामुळे आता हा विदेशी लसूण बाजारात आल्याने शेतकऱ्याचे अधिक नुकसान होणार असल्याचं शेतकरी संघटना नेते एस बी नाना पाटील यांनी म्हटलं आहे. तर आता शेतकऱ्यांच्या या मागणीवर सरकार कोणती पावलं उचलणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.



# शिवनामस्मरणाने दोषांची मुक्ती आणि पुरुषार्थांची प्राप्ती

## डॉ. जगदीश पाटील : श्री गुरुदेव ज्येष्ठ नागरिक संघातर्फे व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** सर्व देवांमध्ये महादेव हा भोळा देव आहे. भोळा असूनही तो चक्रवर्ती आहे. महादेवाच्या केवळ नामस्मरणाने अनेक दोषांपासून मुक्ती होते आणि चारही पुरुषार्थांची प्राप्ती होते. नित्यनेमाने महादेवाच्या नामाचा जप करून नामस्मरण केल्यास मानसिक आनंद मिळतो, असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक डॉ. जगदीश पाटील यांनी येथे केले.

भुसावळ येथील नाहाटा महाविद्यालयात श्री गुरूदेव ज्येष्ठ नागरिक संघातर्फे आयोजित साप्ताहिक व्याख्यानात 'वाचे वदता शिवनाम' या विषयावर त्यांनी ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधला. व्यासपीठावर संघाचे अध्यक्ष प्रकाश विसपुते व सचिव महादेव हरीमकर उपस्थित होते. प्रारंभी गुरूदेव श्रीदत्तप्रभू यांच्या प्रतिमेला डॉ. जगदीश पाटील यांनी पुष्पहार अर्पण केला. यशोदाताई पाटील यांनी जप सादर केला. दिनकर जावळे यांनी डॉ. जगदीश पाटील यांचा परिचय करून दिला.

पुरूषोत्तम मेंडकी यांनी मनोगत व्यक्त केले. विजय चौधरी यांनी 'शिव भोळा चक्रवर्ती' या अभंगाचे गायन केले. डॉ. जगदीश पाटील आपल्या व्याख्यानात म्हणाले की, संत एकनाथ महाराज यांनी शिव नामाचा महिमा अभंगातून सांगितला आहे. भोळा शिव हा चक्रवर्ती देव असून त्यांच्या नामस्मरणाने षड्विकारांची बाधा होत नाही. तसेच महादेवाला प्रत्यक्ष पाहिल्यानंतर धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरूषार्थांची प्राप्ती होते. तसेच शिवनामाचे सातत्याने स्मरण करत राहिल्यास मृत्यूची भीतीही नष्ट होत असते. त्यामुळे आपल्याला मानसिक आनंद व मोक्ष प्राप्त करून घ्यायचा असेल तर शिवनामाचे स्मरण अखंडितपणे केले पाहिजे, असेही डॉ. पाटील यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले. अध्यक्षीय मनोगत प्रकाश विसपुते यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन महादेव हरीमकर यांनी तर आभार सुपडू कुरकुरे यांनी मानले. यावेळी ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# आ.फारुख शाह यांचे हस्ते अमिनाबाद येथील कॉँक्रिट रस्ता कामाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयी सुविधांच्या विकास योजना अंतर्गत प्रभाग क्रमांक 19 नॅशनल हायवे पासून ते मिसबा मज्जिद जुना वडजाई रोड पर्यंत एक करोड रुपयाच्या कॉंक्रीट रस्त्याचे उद्घाटन आ.फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आले धुळे शहरातील रस्त्यांसाठी व मूलभूत सुविधांसाठी आ.फारुख शाह यांच्या प्रयत्नातून सुमारे चार वर्षापासून करोडो रुपयांच्या निधी शहराच्या विकासासाठी येत आहे. पूर्वी शहरात रस्ते व मूलभूत सुविधांच्या विकासासाठी निधी येत नसल्याने शहराची व्यवस्था खड्डेपूर म्हणून गेली होती याला बघून आ.फारुख शाह यांनी धुळे शहरातील संपूर्ण अभ्यास केला व शहरातील विविध भागातील नागरिकांनी रस्ते व गटारी संदर्भात व मूलभूत सुविधांसंदर्भात जे निवेदन दिले त्याला तात्काळ प्रतिसाद देत शासनाकडे निधीची मागणी केली व पाठपुरावा करून चार वर्षापासून शहराच्या विविध भागात लोकांना मूलभूत सुविधा कसे पुरवता येईल याच्याकडे लक्ष केंद्रित केले व आज शहरातील 80 टक्के रस्त्यांचे काम आमदार फारुक शा यांच्या प्रयत्नाने झालेले आहेत. त्याच अनुषंगाने आज रोजी महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सुविधांच्या विकास योजना अंतर्गत प्रभाग 19 नॅशनल हायवे ते मिसबा मस्जिद व निजबा मज्जिद ते जीवनावर जे रोड पर्यंतच्या रस्त्या संदर्भात त्या नागरिकांचे निवेदन आले होते. त्या रस्त्याला रस्त्याला फारुक शाह यांच्या प्रयत्नाने एक करोड रुपयांच्या निधी उपलब्ध झालेला असून त्याच्या शुभारंभ आज आ.फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आले करण्यात आले. हाफिज वसिम, सलीम शाह, नगरसेवक गणी डॉलर, आमिर पठाण, प्यारेलाल पिंजारी, निजाम सय्यद,मौलाना शकील,कैसर अहमद, जावेद मिर्झा, सुफी हाजी, हलीम शमसुद्दिन, आसिफ शाह,अनिस शाह, पप्पू शेख, सलमान खान,जावेद पठाण, बिलाल शेख, फिरोज शेख, सउद आलम,आसिफ अन्सारी, इब्राहिम प्लंबर, आरिफ सैय्यद, रज्जाक पठाण, फाहद मिर्झा, नजर पठाण, वसिम पिंजारी, सद्दाम शाह, रियाज शाह,समीर शाह, मोईन खान, माजीद पठाण, जिड्डुया पहेलवान आदी उपस्थित होते.

# उद्धव भयवाळ यांना अखिल भारतीय हिंदी कविसंमेलनाच्या मुख्य अतिथी पदाचा मान

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** नऊ ऑक्टोबर २०२३ रोजी उत्तराखंडमधील बालसाहित्य संस्थान, अल्मोडा या संस्थेने आयोजित केलेल्या अखिल भारतीय ऑनलाईन हिंदी कविसंमेलनाच्या मुख्य अतिथी पदाचा मान छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ साहित्यिक उद्धव भयवाळ यांना मिळाला. उद्धव भयवाळ यांचे विविध प्रकारातील साहित्य मराठी भाषेप्रमाणेच हिंदी भाषेतही प्रकाशित झालेले आहे हे विशेष. या कविसंमेलनात भारताच्या विविध राज्यांमधील वीसपेक्षा जास्त कवींनी आजी- आजोबा या विषयावरील बालकविता सादर केल्या.

# रायुकॉँच्या फुलंब्री शहराध्यक्षपदी सुनील कुदळे

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** शहरातील युवा कार्यकर्ते सुनील कुदळे यांची अजीत पवार गटाच्या राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसच्या शहराध्यक्ष पदी निवड करण्यात आली असून ही निवड राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांच्या मान्यतेने करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विचारांचा प्रसार पुढील काळात पक्षाच्या माध्यमातून करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. ही निवड औरंगाबाद जिल्हाध्यक्ष अनुराग शिंदे यांच्या हस्ते करण्यात आली.

या निवडीबद्दल आमदार सतीश चव्हाण, औरंगाबाद जिल्हाध्यक्ष कैलास पाटील, जिल्हा उपाध्यक्ष नितीन देशमुख, फुलंब्री तालुकाध्यक्ष बाबासाहेब तांदळे, माजी तालुकाध्यक्ष राहुल डकले, शहराध्यक्ष शाकेर पठाण यांच्या सह आदींनी त्यांचे अभिनंदन केले.



# कपाशीच्या शेतात गांजाची झाडे शेतात पिकवला लाखो रुपयांचा गांजा

## सपोनि भरत मोरे यांची कारवाई सतरा लाखाचा गांजा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील टिटवी येथे टिटवी शिवारातील कासार शिवडी नावाचे कालिंका देवी डोंगराचे पायथ्याशी असलेल्या शेत गट क्र 38 मध्ये फर्दापूर पोलिस स्टेशनचे कर्मचारी व सपोनि भरत मोरे यांनी अचानक या शेतात धाड टाकून आरोपीस अटक केली. स्वताच्या आर्थिक फायद्यासाठी स्वताच्या शेतात बेकायदेशीर रित्या गांजा वनस्पतीची लागवड जोपासना करून व संवर्धन करून 273 किलो 850 ग्रॅम वजनाचा एकुण किंमत 16,43,100/- रूपये प्रति किलो 6000/- रूपये दराप्रमाणे किंमत अंदाजे एकूण 585 ओली मुळासकट मातीमिश्रीत हिरवी गांजाची झाडे असा एन डी पी एस गुन्ह्याचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने मिळून आला म्हणून स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा पोलीसांनी जप्त केली. त्याची किंमत सुमारे १७ लाख रुपये असल्याचे सपनि भरत मोरे यांनी सांगितले. याप्रकरणी शेतकरी सुकलाल धेना जाधव यांच्यावर विविध कलमान्वये 20(A)(B)(1)(2)(B) NDPS ACT. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टिटवी गांवातील या गांजा घटनेमुळं खळबळ उडाली आहे. शेतात कपाशी पिकामध्ये गांजाची झाडे पिकवण्यात आली होती. गुन्हे शाखेच्या पथकाला व पोलिसांना याविषयी माहिती मिळताच त्यांनी तातडीने पावलं उचलत हि कारवाई केली आहे. टिटवी येथील शेतकरी सुकलाल धेना जाधव यांनी गावापासून एक किलोमीटर अंतरावर मौजे टिटवी शिवारातील कासार शिवडी नावाचे कालिंका देवी डोंगराचे पायथ्याशी असलेल्या शेत गट क्र 38 नावाच्या शिवारात कपाशी पिकामध्ये गांजाची झाडे लावल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाने यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी ही कारवाई केली आहे. संबंधितवर कारवाई करताना फरदापुर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत मोरे, सोयगाव तहसीलचे नायब तहसीलदार कृषी खात्याचे कृषी सहाय्यक मानसिंग भोळे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी अटक करून कारवाई केली आहे कारवाई केली आहे. पुढील तपास फरदापुर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे. यामुळे आता सावळदबारा परिसरात लपून छपून गांजाचे झाडे लावण्यांचे धाबे चांगलेच दणाणले.

# वडोद बाजार येथे आयुष्मान भारत गोल्डन कार्डचे मोफत वाटप

आधुनिक केसरी न्यूज



**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत गावातील नागरिकांसाठी मोफत आयुष्मान भारत गोल्डन कार्ड आँनलाईनचे मोफत काढून देण्यात आली यावेळी वडोद बाजारचे उपसरपंच गोपाळ वाघ. यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉक्टर काथार मॅडम शेख जमील, साबेर पठाण, गोविंद पांडे,ग्रामविकास अधिकारी रामदास पाथरे, वडोद बाजार भाळगव, वडोद खुर्द या तींन गावातील नागरिकांसाठी आयुष्मान भारत गोल्डन कार्ड आँनलाईन काढून देण्यात आले या कार्ड च्य माध्यमातुन पाच लाख रुपयाचा उपचार मोफात होणारं आहे. गुरुवारी सकाळी धर्मशाळेत आँनलाईन आयुष्मान भारत गोल्डन कार्ड काढून देण्यात आले यावेळी गावातील नागरिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या साठी ग्रामपंचायत कर्मचारी रेशमाजी वाणी, कृष्णा सहाणे, मनोज वाघ, सुनिता बिलघे, अनिता बिलघे, सुनिता बारोटे, शाहीन शहा, आदी स ह उपास्थित होते.



# अनाथांच्या निवारा बालगृहास आर्थिक मदत

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** लोककलावंत, अनाथ, निराधार, ऊसतोड मजूर, वीटभट्टी कामगार, वंचित, भटके विमुक्त, आदीवासी तसेच गरीब कुटुंबातील मुलामुलींसाठी जामखेड तालुक्यातील समताभूमी मोहाफाटा येथे कार्यान्वित असलेल्या निवारा बालगृहास जवळा येथील विद्यार्थी विद्यार्थिनींनी सामाजिक दातृत्वाचा एक भाग म्हणून आपल्या खाऊच्या पैशातून आर्थिक मदत दिली. यावेळी निवारा बालगृहाचे प्रतिनिधी गोरख भोसले, मच्छिंद्र भोसले, आदित्य चौगुले, शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, शिक्षक नेते संतोष अंबुलगेकर, सहशिक्षक संतोष घटकार, हैदर शेख यांची उपस्थिती होती.

शासनमान्य असले तरी विनाअनुदानित तत्वावर सुरू असलेल्या ग्रामीण विकास केंद्र संचलित या बालगृहासाठी मोठ्या प्रमाणावर निधी मिळणे आवश्यक आहे. दानशूर व्यक्तींनी यासाठी पुढे येऊन सढळ हाताने मदत करणे गरजेचे आहे.

या जाणिवेतून जवळा येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्याला मिळणाऱ्या खाऊच्या पैशातून जमा होणारा निधी निवारा बालगृहाच्या प्रतिनिधींना सुपुर्द केला. निराधारांची सेवा हीच खरी सेवा असल्याने मत शिक्षक नेते संतोष अंबुलगेकर यांनी व्यक्त केले.

# भांडवलदार, धर्मांध लोकांच्या कारस्थानामुळे बहुजन विद्यार्थी, युवकांचा हक्काचा बळी : प्रा. भरांडे

आधुनिक केसरी न्यूज




**नांदेड :** देशाची सत्ता मोजक्या धर्मांध लोकांच्या हातात आहे हे सत्य असून मोदी नावाला प्रधानमंत्री आहेत हे पूर्ण सत्य आहे, देशात न्यायव्यवस्था स्वतंत्र आहे, हा समज सत्य नसून तो गैरसमज आहे, आपल्या देशात कोणतीही संस्था स्वतंत्र किंवा निरपेक्ष नाही. ते कोणाच्या तरी कब्जात आहे, सत्तेची खरी सुत्रे भांडवलदार लोकांच्याच हातात आहेत. म्हणून भांडवलदारांना सोईचे होतील असे निर्णय सरकार घेत आहे. शिक्षण, रोजगार निर्मिती यावर खर्च न करता अनावश्यक बाबींवर करोडो रुपये उधळणे चालू असून या सर्व बेबंदशाहीमुळे SC ST OBC अल्पसंख्याक तरुण सरकारच्या षडयंत्राचे बळी ठरत असल्याचा आरोप लोकस्वराज्य आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.रामचंद्र भरांडे यांनी केला आहे.
महाराष्ट्र सरकारने जिल्हा परिषद, नगरपालिका अंतर्गत चालू असलेल्या सरकारी शाळा खासगी कंपन्यांना चालविण्यासाठी देण्याचा जो निर्णय घेतला तो अतिशय अन्यायकारक असून या निर्णयामुळे शिक्षणापासून बहुजन समाजाला पुन्हा वंचित ठेवल्यास मुठभर लोकांच्याच हातात व्यवस्था केंद्रीत होणार आहे. सरकार बहुजन समाजाला गुलामीत ठेवण्यासाठी सरकारी नौकर्यांचे कंत्राटीकरण,शाळांचे खासगीकरण करण्याचा निर्णय घेत आहे. सर्वच क्षेत्राचे खासगीकरण होत असेल तर मग यापुढे निवडणुकांचा खर्च, मंत्री, सरकार कोणासाठी.? सरकार चालविण्याचे कंत्राट अंबानी, अडाणी यांना देऊन टाका असा सल्ला प्रा.रामचंद्र भरांडे यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिला आहे.

# माही तुरुकमाने चित्रकला स्पर्धेत प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** श्री शिवाजी विद्यायल व कनिष्ठ महाविद्यालय रिसोडच्या वतीने आंतरमहाविद्यालयीन चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या मध्ये कु. माही मिना प्रविण तुरुकमाने हिचा प्रथम क्रमांक आला आहे.



शालेय जिवनातच वेगवेगळ्या कला गुणांना वाव मिळून विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये नावलौकिक करावे यासाठी वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या कडून केले जात असते. याचाच फायदा सर्वसामान्य वर्गातील विद्यार्थ्यांना होऊन त्यांच्या कला गुणांना चालना मिळत असते. माही मिना प्रविण तुरुकमाने ही विद्यार्थीनी सुद्धा अभ्यासा व्यतिरिक्त इतर म्हणजेच नृत्य, चित्रकला, क्रीडा व अभिनय, क्षेत्रात उत्तम प्रकारे प्राविण्य मिळवून अभ्यासासोबतच कलागुणांची जोपासना करते. अभ्यासा सोबतच इतरही कलागुण विद्यार्थ्यांकडे असतील तर यशाची व्याख्या बदलून प्रत्येक जन प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होईल. याच भावनेतून शिक्षकासह पालकांनी सुद्धां कलागुणांना वाव देणे आवश्यक असते. चित्रकलेची कोणतीही पार्श्वभूमी नसलेल्या माहीने अंत्यत सुंदर चित्रकला साकारून विद्यालयातून प्रथम क्रमांक मिळवल्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# प्रदीप गोकुळ पाटील यांना राज्यस्तरीय पुरस्कार २०२३ जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** १२ ऑक्टोबर २०२३ भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न, मिसाईल मेन, डॉ. ए. पी.जे.अब्दुल कलाम सरांच्या ९२ व्या जयंती निमित्त ड्रीम फाऊंडेशन, करुणा ग्रंथवाचक मंडळ व अनुप्रास बहुउद्देशीय शिक्षण संस्था छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा राज्यस्तरीय डॉ.कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार २०२३ साठी अमळनेर येथील पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रदिप गोकुळ पाटील यांची निवड करण्यात आली आहे. मागील अनेक वर्षापासून शैक्षणिक, सामाजिक, युवा जागृती, आधुनिक शेती पर्यावरण व साक्षरता यासह राष्ट्रीय मूल्य लोकांमध्ये रुजविण्यासाठी कार्य करीत आहेत.
त्यांच्या या विधायक कार्याची दखल घेऊन निवड समितीने त्यांची राज्यस्तरीय गौरवासाठी निवड केली असून रविवार दि १५ ऑक्टोबर २०२३ रोजी डॉ.अब्दुल कलाम साहेबांच्या जयंती दिनी सकाळी ११:०० वा. छत्रपती संभाजी नगर येथे वाणी कम्युनिटी हॉल, शिवाजी चौक, शिवाजी नगर, गारखेड येथे अशोक नगरकर - वरिष्ठ वैज्ञानिक, पुणे, (डॉ.अब्दुल कलाम सरांसोबत काम केलेले) डी.आर.डी.ओ.- राजेंद्र वाणी - सामाजिक कार्यकर्ते, अजाबराव मनकर - शिक्षण तज्ञ , मा.अंकिता देखील - युवा शास्त्रज्ञ, शिवाजी वालेकर - यशोदिप करीयर अकॉडेमी, काशिनाथ भतगुणकी लेखक व प्रेरक वक्ते यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. यात सन्मानचिन्हे, सन्मानपत्र, श्रीफळ मानाचा फेटा व डॉ.अब्दुल कलाम यांची ग्रंथे देऊन प्रदिप गोकुळ पाटील (विद्यार्थी) पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय अमळनेर यांचा गौरव करण्यात येणार असून, सहपरिवार, उपस्थित राहून पुरस्कार स्विकारण्याचे आव्हान ड्रीम फाऊंडेशन तर्फे करण्यात आले आहे.



# जळगाव जामोद तालुक्यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शाखेचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जामोद :** तालक्यातील येनगाव,मराखेड खुर्द, मराखेड बु. जळगाव जामोद, येथे मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार राज्य उपाध्यक्ष विठ्ठलभाऊ लोखंडकार यांच्या मार्गदर्शनाखाली ०८ ऑक्टोंबर रोजी मनसे जिल्हाध्यक्ष मदन राजे गायकवाड, संजू भाऊ पळसकार राज्य उपाध्यक्ष, प्रतीक लोखंडकर जिल्हाध्यक्ष विद्यार्थी सेना, शिवचरण पाटील जिल्हा उपाध्यक्ष विद्यार्थी सेना राहुल चोपडे जिल्हा सचिव विद्यार्थी सेना, अकोला जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, यांच्या हस्ते जळगाव जामोद तालुक्यामध्ये येनगाव, मराखेड खुर्द, मराखेड बु. जळगाव जामोद येथील शाखेचे उदघाटन संपन्न झाले. यावेळी तालकाध्यक्ष राजूभाऊ राऊत. तालुका अध्यक्ष विद्यार्थी सेना आनंद सपकाळ शहराध्यक्ष नागेश भटकर, शहर संघटक वैभव येनकर, रजेद्र कुळकर्णी, शाखा मडखेड खुर्द गनेश्वर. प्र. सित्रे शाखा अध्यक्ष.नारायण सु. खडसान,शाखा उपाध्यक्ष. गणेश देते. कोषाध्यक्ष. सचिव.स्यः- मुकुंदा अत्तरकार, आकाश काळे, भिकाजी पिंपळकार, भागवत कडा गोपाल काळे, निरंजन पोहरे, दिनकर जवंजाळ, अंबादास चव्हाण, शाखा मडखेड

# कृषिकन्यांकडून जागतिक कीड नियंत्रण, गुलाबी बोंड अळीवर शेतकऱ्यांत जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**पांढरकवडा :** पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्नित कृषी महाविद्यालय, कोंगारा येथील सातव्या सत्रातील कृषिकन्यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव या कार्यक्रमा अंतरगत पिंपरी येथे जागतिक कीड नियंत्रण आणि गुलाबी बोंड अळी या विषयावर शेतकरी मेळाव्याच्या आयोजन केले. हा कार्यक्रम कृषी महाविद्यालय, कोंगारा येथील रावे इन्चार्ज संकेत येलोरे सर तसेच रावे कॉर्डिनेटर डॉ.जाधव सर यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडला.
या शेतकरी मेळाव्याला उद्घाटक म्हणून पिंपरी गावाचे सरपंच आतरम ताई तसेच पिंपरी गावातील कृषी सहाय्यक चव्हाण मॅडम, कृषी पर्यवेक्षक राठोड सर, तलाठी दातपाडी रोहिणकर सर व पिंपरी येथील तलाठी भोकरे सर यांची प्रमुख उपस्थिती होती.
या कार्यक्रमाला कृषी महाविद्यालय, कोंगारा येथील प्राध्यापक पाटील सर व प्राध्यापिका वाघ मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. कृषीकन्यांनी शेतकऱ्यांना वेगवेगळ्या पिकावरील किडी आणि रोग यावर उपचार पद्धती याबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यानिमित्त गावातील शेतकरी वर्ग उपस्थित होते. हा शेतकरी मेळावा कृषीकन्यां वैष्णवी काळे, काजल बोदे, शामली शेडमाके, संजना बुच्चे, प्रतीक्षा चवले, सृष्टी गयमुखे, वैष्णवी कोटकर, राजेश्वरी जुमडे, श्रावरी दासोडे यांच्या नियोजनाखाली पार पाडला.



# सावनेरातील रॉयल लॉजवर देहव्यापार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** शहरातील देहव्यापार करणाऱ्या तरुणींनी ग्रामीण भागातील ढाबे, हॉटेल आणि लॉजवर देहव्यापार सुरु केला आहे. सावनेरातील रॉयल लॉजवर सुरु असलेल्या सेक्स रॅकेटवर पोलिसांनी छापा घातला. या छाप्यात एका तरुणीला ताब्यात घेतले असून दोन आंबटशौकीन युवकांनाही अटक करण्यात आली. अरुण मदनमोहन रुषिया (जुना धान्यगंज, सावनेर) आणि रंजीत मारोतराव वानखडे (२९, झिल्पा. ता. काटोल) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून सावनेरातील रॉयल लॉजवर सेक्स रॅकेट सुरु होते. या लॉजवर नागपुरातील अनेक तरुणी वेश्याव्यवसाय करीत होत्या. त्यामध्ये काही महाविद्यालयीन तरुणींचा समावेश आहे. सोमवारी ग्रामीण पोलिसांनी लॉजवर छापा घातला. यावेळी एका तरुणीसह रंजीत वानखडे हा देहव्यापार करताना आढळला. त्याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पीडित तरुणीलाही पोलिसांनी ताब्यात घेतले. ती तरुणी उच्चशिक्षित असून आर्थिक स्थितीमुळे ती वेश्याव्यवसाय करीत होती. तिला प्रतिग्राहक १०० रुपये देण्यात येत होते. नागरिकांनीही या लॉजबाबत अनेक तक्रारी पोलिसांकडे केल्या होत्या, हे विशेष.



# शिरपूर पोलिसांची दमदार कारवाई; लाखोंचा गांजा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सपोनि श्री जयेश खलाणे सो. यांना गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, मुडकोविहीर गावाचे शिवारात विठ्ठल बारक्या पावरा याने गांज्या सदृश्य अंमली पदार्थाच्या वनस्पतीची बेकायदेशीरपणे लागवड करून चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाढविले आहे, अशी बातमी मिळाल्यावरुन सपोनि जयेश खलाणे यांना लागलीच मा. पोलीस अधिक्षक सो. धुळे यांची सदर ठिकाणी जावुन कार्यवाही करण्याची परवानगी घेवुन तहसिल कार्यालय शिरपुर येथील राजपत्रीत अधिकारी श्री अधिकार बाळकृष्ण पेंढारकर निवासी नायब तहसिलदार शिरपुर पंच वजनकाटा धारक, फोटोग्राफर व पोलीस स्टाफ सह बुडकीविहीर गावाचे शिवारात पोहचलो व बातमीनुसार इसम नामे विठ्ठल बारक्या पावरा रा. बुडकीविहीर ता. शिरपर जि. धुळे हा कसत असलेल्या शेताचा शोध घेतला असता एका शेतात गांज्या आमली पदार्थ वनस्पतीची लागवड केलेली दिसली. सदर ठिकाणी छापा टाकताच पोलीस आल्याची चाहुल लागताच शेती कसत असलेली इसम हा तेथुन पसार झाला. सदर ठिकाणी कोणताही इसम मिळुन न आल्याने तेथे पोलीस पाटील सुनिल शिवदास पावरा यास बोलावून राजपत्रित अधिकारी व पंचासमक्ष सदर शेत कोण कसत आहे बाबत विचारले असता सदर शेत विठ्ठल बारक्या पावरा रा. बुडकीविहीर ता. शिरपर जि. धुळे हा कसत आहे असे सांगीतले. पोलीस पाटील यांस सोबत घेवून तो कसत असलेल्या शेताची पाहणी करता सदर शेतात मानवी मेंदुवर विपरीत परिणाम घडवुन आणणारा गांज्या सदृश्य अंमली पदार्थाच्या वनस्पतीची बेकायदेशीरपणे लागवड केलेली दिसून आली सदर क्षेत्रामध्ये सुमारे 5 ते 6 फुट पावेतो कमी अधिक उंचीचे झाडांची लागवड केलेली असून सदर झाडे हिरवेगार ताजे उभे असलेले दिसले. सदर शेतातील गांज्या सदृश्य अंमली पदार्थाच्या वनस्पती मुळासकट उपटून त्यांचे वजनकाटा धारक यांनी सदर झाडांची वजनमापे घेतली असता एकुन 32,55,000/- रु. कि. चे एकूण 930 किलो वजनाचा गांजा सदृश्य आमली पदार्थाचे हिरवे ओले ताजे झाड, पाने, फुले व फांदया असलेले मुळासह, मुळापासून ते शेडया पर्यंत उंची अंदाजे 5 ते 6 फुटापर्यंत कमी जास्त असलेले मुळास थोडी माती लागलेली प्रति किलो 3500/-रु दराचे अंदाजे. सदर झाडांचे 30 किलो वजनाचे वेगवेगळे 31 गठठे करून कापडात भरून ते दोरीने बांधून सिलबंध केले. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक संजय बारकुंड सो, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे



सो, मा. उप विभागीय पोलीस अधिकारी श्री सचिन हिरे सो. यांचे मार्गदर्शनाखाली शिरपुर तालुका पोलीस ठाणेचे सपोनि / जयेश खलाणे, संदीप पाटील, कृष्णा पाटील, श्रीमती मंगला पवार, चत्तरसिंग खसावद, आरिफ पठाण, शेखर बागुल, रोहीदास पावरा, राजेश्वर कुवर, जयेश मोरे, योगेश मोरे, शिवाजी वसावे, कृष्णा पावरा, अल्ताफ मिर्झा, मनोज पाटील यांनी केलेली असुन सदर गुन्ह्याबाबत सुनिल पवार यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्यावरुन गु.र.नं. 0230/2023 NDPS कायदा कलम 20 व 22 प्रमाणे गुन्हा दाखल करुन सदर गुन्ह्याचा तपास पोसई / श्रीमती मंगला पवार करत आहेत.

## धमाका ग्रुपने महिलांसाठी व्यासपीठ निर्माण केले

### तेजश्री काकडे : निरा-शिवतक्रार येथे धमाका ग्रुपचे विशेष कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** धमाका ग्रुप हा एक असा ग्रुप आहे. की या ग्रुप मध्ये दोन मिनिटे जरी गेले ना तरी हसत हसत घरी जात असते. येताना थोडा तणाव असतो.पण जाताना एकदम मन मोकळे वाटतं.धमाका ग्रुप एक असा आहे की, जिथे चूल आणि मूल एवढच होतं. तशा परिस्थितीतून धमाका ग्रुपने निरा शिवतक्रार गावांतील महिलांसाठी एक व्यासपीठ निर्माण केलं, असे प्रतिपादन निरा-शिवतक्रार ग्रामपंचायतीच्या सरपंच तेजश्री काकडे यांनी केले.

त्या निरा शिवतक्रार ग्रामपंचायत येथे आयोजित करण्यात आलेल्या नारी शक्तीचा सन्मान पुरस्कार सोहळा कार्यक्रमातून बोलत होत्या. अण्णासाहेब पाटील विकास महामंडळाचे पुणे जिल्हा समन्वयक सुभाष जेधे यांच्या विशेष नियोजनातून या कार्यक्रमाचे आयोजन करत असताना धमाका ग्रुपची मोलाची साथ मिळाली. मान्यवरांकडून धमाका ग्रुपसह सुभाष जेधे यांचे कौतुक करण्यात आले. धमाका ग्रुप ची एक वेगळी ओळख आपल्या महाराष्ट्रात करून दिल्या बद्दल तेजश्री काकडे यांनी सुभाष जेधे यांचे आभार मानले. यावेळी कार्यक्रमास जेष्ठ छायाचित्रकार प्रकाश शिंदे,पोलीस उपनिरीक्षक



नवसारे सर, ग्रामपंचायत सदस्य अनिल चव्हाण, सदस्य संदीप धायगुडे, अनुजा शहा, चंदा लाहोटी, वैजयंती शहा,दादा गायकवाड, अमोल साबळे, विजय धायगुडे, महेश जेधे, सचिन मोरे व इतर मान्यवर उपस्थित होते. तेजश्री काकडे म्हणाल्या की, मी जरी या ग्रुप मध्ये तुमच्या प्रत्येक कार्यक्रमाला,तुमचं जे नियोजन असतं त्यात सहभागी होत नसेल,पण तुमच्या सगळ्यांचे चेहरे बघून, सकाळी मी जेव्हा आले,तेव्हा सर्वांनी मस्त असं कौतुक केलं.सर्वांनी मला अशा उपमा दिल्या. मी म्हटलं उपमा मला नकोय मी जे आहे ते आहे. मी तुमच्यातलीच एक आहे. मी तुमच्या सगळ्यांपेक्षा लहान आहे, असे त्यांनी धमाका ग्रुपच्या महिलांना म्हटले. गौरी सजावट स्पर्धेत संगीता शिंदे, तृप्ती पवार, शीतल मईड यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, आणि तृतीय क्रमांक देत भेट वस्तूने सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनुजा शहा, नेहा शहा, मोहिनी भिसे यांनी केले तर प्रास्ताविक आणि आभार सुभाष जेधे यांनी मानले. तनुजा शहा, शारदा अग्रवाल, पुष्पा सोनी, मिनल निगडे, मंगल आगवणे, वैजयंती शहा, अनुजा शहा, हेमलता पवार, चंदा लाहोटी, सुनिता भादेकर, वनिता जैन,शैला शहा,वंदना चव्हाण, स्मिता दोशी,संगिता जैन,कस्तुर पटेल, पूजा शहा, मनिषा ओसवाल, भाग्यश्री शहा, सायली मेहता, कल्पना पटेल, सेजल कोठाडिया, माधुरी शहा, दीपा शहा, नीना शहा, रेखा पटेल, शोभा शेट्टी, वैजू भोसले, वर्षा शहा, सुजाता गांधी, मोहिनी भिसे, चंदा थोपटे, जयश्री जैन, रुपा शहा, नेहा शहा या सर्वांचे कौतुक सरपंच यांच्यासह मान्यवरांकडून करण्यात आले.

## युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी केशव गरकल

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** येथील पत्रकार केशव गरकळ यांची



युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वाशिम जिल्हा उपाध्यक्ष पदी नुकतीच नियुक्ती करण्यात आलीआहे. युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी नुकतेच केशव गरकळ यांना नियुक्ती पत्र देऊन त्यांचा सत्कार केला व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. गोरगरीब व शेतमजुरांच्या हक्कासाठी सदैव तत्पर राहून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी युवा ग्रामीण पत्रकार संघ कार्यरत असून त्यांनी आतापर्यंत अनेक शेतमजूर व गोरगरिबांना न्याय मिळवून दिला आहे. वाशिम जिल्ह्यातील शेतमजूर व गोरगरीब यांना न्याय मिळवून देण्यासाठी वाशिम जिल्हा उपाध्यक्षपदी युवा पत्रकार केशव गरकळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.केशव गरकळ हे रिसोड येथील रहिवासी असून त्यांनी भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या माध्यमातून अनेक गोरगरी व शेतमजुरांना न्याय मिळवून देण्याचे सत्कार्य केले आहे. तद्वतच, भूमिपुत्र शेतकरी संघटनेची युवक राज्य उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सुध्दा ते पार पाडत आहेत. विशेष म्हणजे केशव गरकळ हे उदयवार्ता न्यूज चॅनलचे वाशिम जिल्हा प्रतिनिधी म्हणून सुद्धा काम पाहत आहेत. सामाजिक व राजकीय कार्यात त्यांचा सहभाग असून ते भगवान सेना वाशिम जिल्हा प्रसिद्धी प्रमुख म्हणून सुद्धा काम करीत आहेत.केशव गरकळ यांची युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वाशिम जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्यामुळे सामाजिक व राजकीय तसेच पत्रकार क्षेत्रातील मंडळीने त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव केला आहे.

नियुक्तीला उत्तर देताना युवा पत्रकार केशव गरकळ म्हणाले की, युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी जी माझ्यावर जिल्हा उपाध्यक्ष पदाची जबाबदारी टाकली त्या माध्यमातून मी सर्वसामान्य जनता शेतमजूर व गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर राहील. तसेच त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेवटच्या घटकापर्यंत प्रयत्न करणार असल्याचे केशव गरकळ यांनी सांगितले.केशव गरकळ यांनी आपल्या निवडीचे श्रेय युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार, भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर ,राज्य प्रवक्ते डॉ. जितेंद्र गवळी, युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष करण धोंगडे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य एम डी सुरोशे यांच्यासह सर्व मित्र मंडळींना दिले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर